मंगळवार, २ जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १३९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 2 JANUARY 2024 adhunikkesari.com Adhunik Kesari ● YEAR-03 ● ISSUE-139 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# ट्रकचालकांच्या आंदोलनाला हिंसक वळण

## पोलिसांना मारहाण : बस फेऱ्या रद्द, प्रवाशांची गैरसोय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : नवीन मोटार वाहन कायद्याविरोधात सोमवारपासून ट्रक चालक रस्त्यावर उतरले आहेत. नवी मुंबई ते जेएनपीटी मार्गावर कोंबडभुजे गावालगत असलेल्या रस्त्यावर ट्रक चालकांचे आंदोलन सकाळपासून सुरु झाले. सकाळी साडे अकरा – बारापर्यंत सदर आंदोलन सुरळीत सुरु होते. मात्र त्यानंतर पुन्हा रस्ता अडवण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्याला विरोध करणाऱ्या पोलिसांवर ट्रक चालकांनी हल्ला चढवला. आंदोलकांनी पोलिसांना मारहाण करीत मागे हटवले तसेच दगडफेक आणि काठ्यांनी मारहाण केली.**





दुपारी काही ट्रक चालकांनी रस्ता अडवण्याचा प्रयत्न केला. त्यांची पोलिसांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला असता काही ट्रक चालकांनी सामान्य गाड्यांना लक्ष करीत काठ्यांनी हल्ला केला. यात अनेक गाड्यांच्या काचा फुटल्या. एवढ्यावरच हे थांबले नाहीत, तर रस्त्यावर दगड टाकण्यात आले. पोलिसांवर दगडफेक केली गेली आणि काठ्यांनी काही पोलिसांना मारहाण केली गेली. पोलिसांनी अधिक कुमक मागवली आणि लाठीचार्ज करीत ५० पेक्षा अधिक ट्रक चालकांना ताब्यात घेतले आहे, अशी माहिती एनआरआय पोलिसांनी दिली. मात्र अद्याप वातावरण तणावपूर्ण असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

**250 बस फेऱ्या रद्द, प्रवाशांचीही मोठी गैरसोय :** केंद्र सरकारच्या नवीन मोटार वाहन कायद्याबाबत ट्रकचालकांमध्ये प्रचंड नाराजी पाहायला मिळत आहे . या कायद्याला देशभरातील ट्रकचालकांकडून विरोध होत असल्याचे चित्र आहे . त्यामुळे याचे पडसाद देशासह राज्याच्या कानाकोपऱ्यात उमटतांना बघायला मिळत आहे . या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भंडारा आगारातील नागपूरच्या दिशेनं जाणाऱ्या सुमारे 250 बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत . ट्रक चालकांनी नागपूर – कलकत्ता राष्ट्रीय महामार्गावर नागपूर जिल्ह्यात बंद पुकारला आहे . अगदी सकाळपासून भंडारा आगारात अनेक प्रवासी नागपूरच्या दिशेने प्रवास करण्याकरिता पोहोचलेत . अनेकांनी बसचे तिकीटही काढले . मात्र, त्यानंतर वाहकांनी काढलेले त्यांचे तिकीट रद्द करीत त्यांना तिकिटाचे पैसे परत केले . बराच वेळपर्यंत प्रवाशांना नागपूरच्या दिशेनं कुठलीही बस मिळाली नसल्यानं अनेकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला आहे .

**असा आहे नवीन कायदा :** नवीन मोटार वाहन कायद्यानुसार ट्रकमुळे एखादा व्यक्ती जखमी झाल्यास त्याला तात्काळ रुग्णालयात नेले पाहिजे, तसे न केल्यास आणि ट्रकचालक दोषी आढळून आल्यास त्याला सात वर्षांची शिक्षा आणि सात लाख रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे . भारतात 28 लाखांहून अधिक ट्रक चालक 100 अब्ज किलोमीटरचे अंतर कापतात . या ट्रकवर 50 लाखांहून अधिक लोकं काम करतात . अशा परिस्थितीत ट्रकमुळे होणारे रस्ते अपघातही सर्रास घडत आहेत . त्यामुळेच सरकारने नवीन कायदा आणला असल्याचे बोलले जात आहे .

**गोंदियात टायर जाळून केंद्र सरकारचा निषेध :** केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्यानुसार यापुढे अपघातास जबाबदार ट्रकचालकास 10 वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे . सोबतच सात लाख रुपये दंड देखील आकाराला जाणार आहे . दरम्यान, याच कायद्याला देशभरात विरोध होत असून, चालकांनी थेट संपाची हाक दिली आहे . याचे अनुषंगाने गोंदिया शहरातील कुडवा चौक येथे आज नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच टायर जाळून केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला . यावेळी वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी रामनगर पोलिसांनी 13 चालकांना ताब्यात घेतले आहे .

**बुलढाण्यात टायर जाळून महामार्ग अडवला :** बुलढाणा जिल्ह्यात देखील ट्रक चालक आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे . राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर मलकापूर–घोडसगाव नजिक रस्त्यावर टायर जाळून महामार्ग अडवण्यात आला आहे . गेल्या एक तासांपासून महामार्ग अडवून वाहन चालकांची घोषणाबाजी सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे . अपघात झाल्यानंतर पळून जाणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्या नवीन नियमाला वाहन चालकांनी यावेळी विरोध केला आहे . पोलिस आंदोलनस्थळी पोहचले आहेत .



शौर्यदिनानिमित्त भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला राज्यभरातून आलेल्या लाखो आंबेडकरी अनुयायांनी सोमवारी अभिवादन केले.

## सोरेन यांच्या पत्नी होणार मुख्यमंत्री ?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन हे लवकरच मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असून त्यांच्या जागी त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी घेऊ शकतात, असा खळबळजनक दावा भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी केला आहे. झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम) पक्षाच्या आमदाराने नुकताच आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून विधीमंडळाने तो स्वीकारला आहे. तसेच मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडीचे सातवे समन्स प्राप्त झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भाजपा खासदार दुबे यांनी हा दावा केला आहे.हेमंत सोरेन यांच्या पत्नीची नियुक्ती मुख्यमंत्रीपदावर केली जाऊ शकते, असा दावा दुबे यांनी केला. दुबे हे झारखंडमधील गोड्डा लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे खासदार बनले आहेत. एक्स या सोशल मीडियावर पोस्ट टाकून त्यांनी हा दावा केला. तसेच हे वर्ष सोरेन कुटुंबियांना कष्टदायक (अवघड) आहे, असेही सुतोवाचही त्यांनी केले. निशिकांत दुबे आपल्या पोस्टमध्ये म्हणाले, झारखंडच्या गांडेय विधानसभेचे आमदार सरफराज अहमद यांनी विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला, तो स्वीकारलाही गेला. हेमंत सोरेनही मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देतील आणि त्यांची पत्नी झारखंडची पुढची मुख्यमंत्री बनेल. नवीन वर्ष सोरेन कुटुंबियांना कष्टदायक. झारखंडच्या राज्यपालांनी या विषयात कायदेशीर सल्ला घ्यावा, असेही दुबे यांनी सुचविले आहे. आणखी एक पोस्ट टाकून त्यांनी म्हटले, “विद्यमान विधानसभेची स्थापना २७ डिसेंबर २०१९ साली झाली. तसेच ३१ डिसेंबर रोजी सरफारज अहमद यांचा राजीनामा आला आहे, याचा अर्थ निवडणुकीला एक वर्ष उरला असल्यामुळे या मतदारसंघात पुन्हा निवडणूक होऊ शकत नाही.

## सेवा संकल्प प्रतिष्ठानला मनोरुग्णांसाठी २७ क्विंटल धान्य

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. बाळासाहेब बोराडे

श्रीक्षेत्र राजुर : दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नववर्षाचे औचित्य साधून राजुर व परिसरातील शेतकरी, महिला, व्यापारी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या संकल्पनेतून प्रत्येकी दहा किलो याप्रमाणे 27 क्विंटल गव्हाचे संकलन करून पळसखेड सपकाळ येथील सेवा संकल्प प्रतिष्ठानचे प्रकल्प संचालक डॉ. नंदकिशोर पालवे, डॉ.आरती पालवे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील पळसखेड सपकाळ येथे सेवा संकल्प प्रतिष्ठान या नावाने पालवे दांपत्ये मनोरुग्णूसाठी प्रकल्प चालवतात. ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून त्यांनी मनोरुग्णांची सेवा करण्याचा संकल्प केला आहे.ज्यांना समाजाने दुर्लक्षित केले,रक्ताच्या नात्यांनी नाकारले अशा बेघर, निराधार, पीडित लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम पालवे दाम्पत्य करत आहे. आजमितीला आश्रमात 200 पेक्षा जास्त मनोरुग्ण उपचार घेऊन सामान्य जीवन जगत आहेत. मनोरुग्णासाठी प्रकल्प चालवणे अत्यंत जिकरीचे काम आहे. भौतिक सुविधा, वैद्यकीय साधनसामग्री,औषधी, धान्य, मनुष्यबळ यांची नेहमीच चणचण भासत असते. परंतु अशा बिकट परिस्थितीतही पालवे दाम्पत्यांनी मनोरुग्णांचे सेवेत खंड पडू दिला नाही. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी राजुर व परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी नववर्षाच्या प्रारंभी सेवा संकल्प आश्रमास मदत करण्याचे ठरवले होते.त्यानुसार 258 लोकांनी यात सहभाग नोंदवून प्रत्येकी दहा किलो याप्रमाणे 27 क्विंटल गव्हाचे संकलन करून सेवा संकल्प आश्रमाकडे सुपूर्द करण्यातआले. मानवतेचे




भावनेतून मनोरुग्णांना मदत केल्याचे समाधान सामाजिक कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर दिसून आले. सेवा संकल्प प्रकल्पास धान्य स्वरूपात मदत केल्याबद्दल डॉ. आरती पालवे व डॉ.नंदकिशोर पालवे यांनी राजूर व परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांचे आभार मानले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## मानवतेचा आणि सेवेचा प्रकाश : डॉ. प्रकाश आमटे



आधुनिक केसरी

कोणत्याही सहृदय व्यक्तीचे मन हेलावून टाकणारे ते दृश्य होते. प्रकाश यांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. त्यांनी त्या आदिवासींना त्या पिलाला सोडून द्या म्हणून विनंती केली. पण ते म्हणाले की आमच्या लेकरांना खायला काय द्यायचे ? तेव्हा डॉ प्रकाश यांनी त्यांना डाळ तांदूळ दिले. तेव्हा आदिवासींनी ते पिलू त्यांच्या हवाली केले. ही त्यांच्या प्राणी अनाथालयाची पहिली सुरुवात होती. पुढे मग जंगलात सापडलेली अनाथ पिले आदिवासी डॉ प्रकाश यांना आणून देऊ लागले. आपल्या आईलाही ज्यांनी पाहिले नाही अशा या अनाथ पिलांना आईची माया डॉ प्रकाश यांनी दिली. हेमलकसा इथे साधारणपणे १९७४ च्या सुरु झालेल्या लोकबिरादरी प्रकल्पाला आता ५० वर्षे पूर्ण झाली आहेत तर २६ डिसेंबर हा डॉ प्रकाश यांचा जन्मदिवस. ते आता ७५ वर्षांचे झाले आहेत. या दरम्यान जीवनातील खूप चढउतार या दाम्पत्याने अनुभवले आहेत. शून्यातून विश्व निर्माण करणं म्हणजे काय असतं याचा मूर्तिमंत आदर्श म्हणजे आमटे कुटुंब. तोच वारसा डॉ प्रकाश आणि मंदाताई यांनी पुढे चालवला. अनेक आदिवासींना मोफत वैद्यकीय सेवा पुरवली. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यांची पुढची पिढीही हा वारसा जपते आहे, पुढे नेते आहे. आपल्या परिसरातील रुग्णांची सेवा करता करता डॉ प्रकाश याना गेल्या वर्षी एका दुर्धर आजाराचा सामना करावा लागला पण सेवाकार्याची पुण्याई पाठीशी असल्याने त्यातूनही ते सुखरूप बाहेर पडले. आदिवासींची सेवा करताना त्यांनी भेदभाव केला नाही. अनेक नक्षलवाद्यांवरही त्यांनी उपचार केले, त्यांचे समुपदेशन केले. भ्रष्ट आणि लाचखोर अधिकाऱ्यांची दूर रवानगी केली. हेमलकसा येथील शाळा सुद्धा पाहण्यासारखी आहे.



## आनंदी पहाट

### मनाला प्रशिक्षित करणारी गुरुकिल्ली

आधुनिक केसरी

आपण डिजिटल विचलनाच्या युगात राहतो; जे आम्हाला महत्त्वाच्या गोष्टींपासून दूर खेचू शकते; त्यामुळे आपल्याला भारावून गेल्यासारखे अथवा थकल्यासारखे वाटू शकते. डिजिटल क्लीन- अप वापरून पहा, जसे की आपल्या मोबाईल फोनवरील मेसेजेस पाहाहे कमी करणे किंवा तंत्रज्ञान- मुक्त वेळ नियमितपणे व्यतीत करणे. यामुळे आपल्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या लोकांवर आणि स्वतःच्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आपल्याला अधिक वेळ आणि जागा मिळेल. अतिविचारात हरवून जाणे ही दुरवस्था आपल्या मनाला विचलित करणारी, निरुपयोगी आणि थकवणारी असू शकते. जेव्हा आपल्या मनात विचारांचा गोंधळ माजलेला असतो, तेव्हा स्वतःला सावरणे, मनाला आवरणे आणि स्वतःला वर्तमान क्षणी परत आमंत्रित करणे; हे आवश्यक असते. आपण काय पाहू, ऐकू, अनुभवू शकतो, कशाचा वास घेऊ शकतो आणि चव घेऊ शकतो; ह्याची जाणीव आपल्या स्वतःलाच अधिक चांगली होऊ शकते. आपल्या मेंदूला रीसेट आणि रिचार्ज करण्यासाठी देखील वेळ देणे आवश्यक असते. मानसिक विश्रांतीमुळे आपले लक्ष, सर्जनशीलता, ऊर्जा आणि उत्पादकता वाढते. आपल्याला विश्रांती घेण्यासाठी काहीही करण्याची किंवा झोपण्याची गरज नाही. अशावेळी केवळ आपल्यासाठी पुनर्संचयित करणारा क्रियाकलाप शोधावा. हे वाचन, संगीत ऐकणे, बागकाम करणे किंवा जिगसॉ पझल पूर्ण करणे यापासून देखील साध्य होऊ शकते. झोप आपल्या मेंदूला आणि शरीराला तंदुरुस्त करण्यास आणि पुनर्प्राप्त करण्यास अनुमती देते, मदत करते. स्मृती, मूड, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये देखील त्यामुळे सुधारतात. त्यासाठी जगामध्येआपण सर्वोत्कृष्ट दिसण्यासाठी, आपल्या स्वतःला रिचार्ज करण्यासाठी आपण स्वतःसाठी दर्जेदार वेळ देणे महत्त्वाचे आहे. नेहमीपेक्षा एक तास आधी झोपण्याचा प्रयत्न करावा किंवा शक्य असणाऱ्यांनी दुपारची झोप घ्यावी. आपली दिनचर्या ही मनाला प्रशिक्षित करण्याची गुरुकिल्ली असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## सारे चराचर | गोविंदाचे ||

जाणिला जयाने | आत्मरूप भाव ||
लाभे त्यासी ठाव | गोविंदाचा ||१||
सांगे माझा ज्ञाना | सगुण निर्गुण ||
रूप तेच जाण | गोविंदाचे ||२||
संसारी चकवा | भुलवी मनाला ||
आधार जीवाला | गोविंदु रे ||३||
आकळेना ज्ञान | गावेना वैराग्य ||
लीन झाले भाग्य | गोविंदाशी ||४||
एक राम कृष्ण | एक हरि हर ||
सारे चरा चर | गोविंदाचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

स्त्रियेस अवलोकिलें ।वियोगें दुःख बहुत वाटलें ।
प्रारब्धसूत्र तुकलें ।रुणानबंधाचें ॥३०॥
कंठ सद्गदित जाला ।न संवरेच गहिवरला ।
लेंकुरा आणी पित्याला ।तडातोडी जाली ॥३१॥
जरी रुणानुबंध असेल ।तरी मागुती भेटी होईल ।
नाहीं तरी संगती पुरेल ।येचि भेटीनें तुमची ॥३२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीतै बिन आशा रहै,
स्मरण होय आसक्त ।
कामोदय मोह बुद्धि भ्रम, स्वयं नष्ट रहै
जक्त ।।१२३।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/१२३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाः
इंद्रियांना न जिंकता जी आशा असते ती म्हणजे विषयांचं स्मरण आणि त्यांची आसक्ती मात्र आहे. काम उदय झाल्यावर बुद्धीत भ्रम तसेच अज्ञान उत्पन्न होते आणि स्वतः साधक आणि त्याचा संसार नष्ट होऊन जातो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

आपण जन्मल्यापासून अहंतेच्या रूपात वावरतो. मानव जन्म या अहंते मुळेचं दुःखी असतो. पंचभूतात्मक पदार्थांना सर्व बाजूंनी आवरणारे आत्मस्वरूप अतींद्रिय आहे. हे अतींद्रिय प्रत्येका जवळ असते. पण ते समजून घेण्याचा प्रयत्न कधी केला जात नाही. सर्व काही इंद्रियांना पहाण्याची सवय झाल्याने अतींद्रिय व सुक्ष्म परमात्मवस्तूच आपण डोळसपणे पाहायला हवे. पण मानवी बुद्धीला ज्या मर्यादा आहेत त्यामुळे ते शक्य होत नाही. आपण "मी"पणाच्या जगात वावरतो. माझं शिक्षण,माझं रूप,माझी नोकरी माझा संसार,घर,गाडी ,बंगला हे आणि ते अशा कधीच न संपणारी गोष्ट आहे त्याच्या मागे लागून आयुष्यातील परमात्मस्वरूप विसरतो. निखळ आनंद फक्त परमात्मप्रेमानेचं मिळते. म्हणून*मी ब्रह्म आहे हा अहंतेचा भ्रम बाजूला करावा. अन्वय अन्वय म्हणजे स्वरूपाचा आहे पणाने विचार करणे. व्यतिरेकस्वरूपाचा नाही पणाने विचार करणे. हे दोन्ही एकमेकांना समजून घेण्यासाठी वापरावे लागतात. खरे स्वरूप शब्दांच्या पलीकडे आहे. चारी वाणी जिथे आटतात तिथे शब्द कसे पोहोचतील. शब्द हे नाशवंत आहेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## जनार्दन स्वामी


आधुनिक केसरी

हीच आशा एक देवा पुन्हा याला का या गावा जय जय जनार्दन देवा निरंतर घडो तुमची सेवा जनार्दन स्वामी माझे आई मजला ठाव द्यावा पायी. कोपरगावला दिनांक ११.१२.१९८९ दुपारी १२ वाजता समाधी सोहळा सुरु झाला,पंचपोचार पूजा व सर्व धार्मिक परंपरेचा विधी पु.प्राणवानंद सरस्वती व अनेक साधूंच्या मार्गदर्शनाने सुरु झाला.हा सोहळा पाहण्यासाठी किमान ४ ते ५ लक्ष लोक हजर होते. माध्यान्हीला येत असलेल्या सूर्य नारायणाचे साक्षीने या ज्ञान सूर्याला अखेरचा विनम्र अभिवादन करून पंच भौतिक पवित्र देह समाधिस्त केला. आज २१ कळसाचे सुंदर मंदिर आपणास दिसते. समाधी स्थानावर श्री राष्ट्रसंत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांची पंचधातूची सुवर्ण जडित मूर्ती विराजमान आहे.

## नाम घेताना मनात एक परमेश्वरच पाहिजे

आधुनिक केसरी

खरोखर, भगवंताला आपल्या प्रेमाशिवाय दुसऱ्या कशाचीही गरज नाही. ते प्रेम आतून यायला पाहिजे. परंतु परमेश्वराबद्दल खरे प्रेमच उत्पन्न होत नाही असा आपला अनुभव आहे. परमेश्वराला प्रेमाने हाक मारताच येत नाही आपल्याला. मग ती त्याला ऐकू कशी जाणार ? सहवासाने प्रेम वाढते. आगगाडीच्या चार तासांच्या सहवासाने जर प्रेम उत्पन्न होते, तर नामस्मरणाने प्रेम का उत्पन्न होणार नाही ? देहाशी अनंत जन्मांचा सहवास असतो, म्हणून देहावर प्रेम जडून देहबुद्धी येते. नामाचा सहवासही पुष्कळ म्हणजे सतत करावा, म्हणजे विषयावरची आणि देहाची आसक्ती कमी होऊन नामावर प्रेम जडते. बायकोमुलांच्या प्रेमाकरिता आपण केवढा त्याग करतो ! मग परमेश्वराच्या शाश्वत सुखाकरिता क्षुद्र वासनांचा त्याग आपण का करू नये ? नाम घेत असताना मनात एक परमेश्वरच पाहिजे; दुसरी कोणतीच वृत्ती उठता कामा नये; तेच खरे नामस्मरण. विकार हे काही मुळात टाकाऊ नाहीत. ते भगवंतानेच दिले आहेत, म्हणून त्यांना जीवनात योग्य स्थान



असेलच असेल; किंबहुना, व्यवहारामध्ये विकारांची जरुरी आहे. मात्र विकारांवर आपण सत्ता गाजवून वापरायला शिकले पाहिजे, विकारांनी आपल्यावर सत्ता गाजविता कामा नये. समजा, राजगिरा आणि भुईमुगाचे दाणे मिसळले आहेत; ते वेगळे करायचे असतील तर त्यांतले एक काढले की दुसरे आपोआप शिल्लक राहते; शिवाय, त्यामध्ये बाहेर काढायला जे सोपे आहे ते आपण काढतो; त्याप्रमाणे, घ्यायला सोपे असलेले भगवंताचे नाम आपण घेत गेल्याने विषय आपोआप बाजूला पडेल. दाणे निवडून काढताना थोडासा राजगिरा जरी लागला तरी आपण तो झाडून टाकतो. त्याप्रमाणे, भगवंताच्या अनुसंधानामध्ये नको असला तरी थोडा विषय येणारच; पण तो हवेपणाने भोगला नाही तर तो आपल्याला बाधक होणार नाही. सर्व संतांचे सांगणे एकच आहे आणि ते असे की, " तू भगवंताचे अनुसंधान म्हणजे स्मरण ठेव, त्याने तुला सत्याचे ज्ञान होईल. " भगवंताचे अनुसंधान याचा अर्थ असा की, बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल, पण परमात्म्याचे विस्मरण होता कामा नये. भगवंताचे अनुसंधान कोण कसे ठेवील याचा नेम नाही. कोणी पूजा करून ते ठेवील, तर कोणी भजन करून ते ठेवील, कोणी नामस्मरण करून ठेवील, कोणी मानसपूजा करून ते ठेवील, तर कोणी चित्रकलेमध्येसुद्धा ठेवील. भगवंताचे अनुसंधान हे आपले ध्येय ठेवावे, आणि त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी आपण करू या. कर्तव्याची जाणीव आणि भगवंताचे अखंड अनुसंधान हेच सर्व पोथ्यांचे सार आहे.

**३४९. अखंड मुखी रामनाम, आत असावे अनुसंधान, हाच सगळा परमार्थ जाण.**



तिमिरातुनी... तेजाकडे ! पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, २ जानेवारी २०२४


# लोह्यात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने विद्यार्थ्यांना, रुग्णांना फळे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वसंत मुंडे व राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त लोहा तालुका पत्रकार संघाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना तसेच रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. सातत्याने राज्यासह देशातील पत्रकारांच्या अडीअडचणी, समस्या आणि विविध प्रश्न घेवून लढा देत असलेले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वसंत मुंडे आणि राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे या दोघांचा वाढदिवस एकाच दिवशी आल्याने लोहा तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार संघाचे जिल्हा निवड समिती अध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या नेतृत्वाखाली शालेय विद्यार्थ्यांना तसेच उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ बारी, डॉ. प्रशांत जाधव, शेळके, शासकीय वसतिगृहाचे व्यवस्थापक फसियोद्दीन शेख, शेटे, विषय तज्ञ बाळू चव्हाण, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील चव्हाण, पत्रकार प्रदीप कांबळे, अंबादास पवार, संग्राम चव्हाण, विशाल घंटे, तुळशीराम पाटील लुंगारे, मारोती कांबळे, विश्वनाथ शिंदे, सुनील पाटील पवार आदींसह बहुसंख्य पत्रकारांची उपस्थिती होती.



# अनधिकृत पॅथालॉजी लॅबला अभय कुणाचं..?

## भोकर येथे रुग्णांची आर्थिक लूट

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात नियमबाह्य पॅथॉलॉजी लॅब टाकून रुग्णांची आर्थिक लूट केली जात आहे, मान्यता प्राप्त व प्रशिक्षित पॅथॉलॉजिस्ट नसताना सर्रासपणे रक्त चाचणीचे अहवाल दिल्या जात आहे. या प्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी बसपाच्या वतीने करण्यात आली आहे.

शहरात दोनच पॅथॉलॉजी लॅब अधिकृत असून ईतर नियमबाह्य कारभार सुरू आहे. काही प्याथालॉजीकडे तर परवानाच नाही नूतनीकरणही केले जात नाही, ज्यांच्या नावाने पदवी आहे ते इथे राहतच नाहीत, त्यांच्या हाताखाली काम करणारे इतर कर्मचारीच विविध प्रकारच्या रक्त नमुन्याचा अहवाल देतात हा गंभीर प्रकार शहरात चालू आहे.

**तज्ञाचा अभाव :** सर्वोच्च न्यायालयाने १२ डिसेंबर २०१७ रोजी पॅथॉलॉजी बाबत आदेश काढला आहेत .त्यात एमडी पॅथॉलॉजिस्ट अँड मायक्रो बायोलॉजी डिप्लोमा इन क्लीनिकल पॅथॉलॉजी( डीसीपी ) डिप्लोमा इन पॅथॉलॉजी अँड बॅक्टेरियालॉजी यांचा समावेश आहे या तज्ञ व्यक्तींच्या देखरेखीखाली यंत्रसामुग्रीची सर्व तपासणी करावयाची असते, त्याला इंटरनल क्वालिटी कंट्रोल म्हणतात . तपासणीचा डाटा एकत्र करून त्यांचा निर्णय द्यावयाचा असतो . नव्हे तर निदानासंबंधी ही आपले मत प्रदर्शित करून नंतरच रिपोर्टवर सही करावयाची असते, इतकी जबाबदारी अधिकृत पॅथॉलॉजिस्ट यांची असते . महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने १ सप्टेंबर २०१८ रोजी परिपत्रक काढले आहे . परंतु पॅथॉलॉजी लॅब मध्ये अनावश्यक तपासण्या करून रुग्णांची लूट केली जाते .

**दर पत्रक नाही** :लॅब मध्ये तपासणीचे दर पत्रक लावले नाहीत .पावती दिली जात नाही नियमाला डावलून दुप्पट तिप्पट पैसे घेतले जातात अशा तक्रारी देखील आहेत

**जैविक कचरा रस्त्यावर :** शहरात काही खाजगी दवाखाने तर काही पथोलॉजीचा जैविक कचरा रस्त्यावरच फेकल्या जात असल्याचा गंभीर प्रकार होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे जैविक कचरा नेणाऱ्या नांदेड येथील एजन्सी धारकाकडून यादी मागितली असता शहरात( १४ ) , बाह्य रुग्ण विभाग ( २ ), अंतर रुग्ण विभाग व ( २ )पॅथॉलॉजी यांचाच जैविक कचरा नेला जातो . इतर दवाखान्यांचा व पॅथॉलॉजीचा जैविक कचरा उघड्यावर टाकला जातो .त्यामुळे नाडरीकाचे आरोग्यास धोक्यात आले आहे .सदरील कारभाराची चौकशी करावी अशी मागणी बसपाचे डॉ . कैलास कानींदे यांनी केली आहे .

# कृषी विज्ञान केंद्राद्वारे कापूस परिसंवाद व शेतकरी मेळावा

## कापूस पिकासाठी यांत्रिकीकरण काळाची गरज : डॉ. अर्जुन तायडे

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र वाशिम द्वारे विशेष कापूस पीक प्रकल्पा अंतर्गत कारंजा ( लाड ) येथे कापूस पीक कृषीमेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यात केंद्रीय कापूस पीक संस्था नागपूरचे डॉ. अर्जुन तायडे यांनी कापूस पिकासाठी यांत्रिकीकरण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र वाशिम द्वारे विशेष कापूस पीक प्रकल्प अंतर्गत कापुस पीक कृषिमेळावा कार्यक्रम शनिवार ३० डिसेंबर २०२३, ला कारंजा (लाड) येथे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांचे स्वागत व दिप प्रज्वलन करुन भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या कृषी गिताने झाली. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे प्रमूख तथा वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ रवींद्र काळे तर अध्यक्ष म्हणून प्रमुख विशेष कापुस पीक प्रकल्प व समन्वयक, विशेष कापुस प्रकल्प, ICAR केंद्रिय कापुस पीक संस्था नागपूर डॉ अर्जुन तायडे इतर मान्यवरांमध्ये जैवतंत्र शास्त्रज्ञ तथा विशेष कापुस प्रकल्प अधिकारी ICAR -CICR नागपुर श्री. राकेश कुमार , कृषी विज्ञान केंद्र वाशिम चे तज्ञ अधिकारी डॉ एस के देशमुख, श्री आर एस डवरे, श्री टी एस देशमुख व सौ शुभांगीताई वाटाणे , प्रभारी तालुका कृषि अधिकारी कारंजा श्री रविंद्र जटाले , राशी प्रा ली. चे व्यवस्थापक श्री गौरव मानकर व क्षेत्र अधिकारी श्री चवरे , केवीके चे संगणक सहाय्यक श्रीकृष्णा बावस्कर इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विशेष कापुस प्रकल्पातील



अतिघनता व्यवस्थापनाचे उद्देश्य व स्थिती याबाबत टी एस देशमुख यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ रवींद्र काळे यांनी शेतकऱ्यांना कापुस पिकाच्या प्रकल्पातील विविध तांत्रीक उपक्रमांचे महत्व सांगुन केविकेव्दारे राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. तसेच शेतीवरील खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा असे आव्हान केले.

कृषीमेळावा प्रसंगी तांत्रिक सत्रात, श्री आर एस डवरे यांनी कापुस पीकसंरक्षण तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. श्री रविंद्र जटाले यांनी शेतकरी हिताच्या प्रोत्साहक योजना सांगितल्या. गौरव मानकर यांनी कपाशी संशोधित वाण वैशिट्ये कथन केले. सौ वाटाणे मॅडम यांनी महिलांचे शेतीमधील श्रम कमी करणारे विविध तंत्रज्ञानाबाबत उपस्थित शेतकरी व कृषी सखींना अवगत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ICAR -CICR नागपूर चे डॉ अर्जुन तायडे यांनी शेतकरी केंद्रित कापुस प्रकल्पाची मांडणी व संशोधन कार्याचे महत्त्व सांगुन कोरडवाहू शेतकऱ्यांकरिता सघन कापूस लागवड तंत्रज्ञान फायदेशीर असून कापूस पिकासाठी यांत्रिकीकरण काळाची गरज असल्याचे सांगितले.

श्री. राकेशकुमार यांनी कापुस पीक शेती आणि प्रात्यक्षिक भेटीतून तांत्रिक अनुभव सांगत बीटी कापुस तंत्राचे महत्त्व शेतकऱ्यांना सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रयोगशील शेतकरी प्रदीप ठोकळ( वडवी ) , रमेशराव देशमुख (सोहोळं) यांनी कापूसशेती व प्रकल्प तंत्र अनुभव यावर प्रतिक्रिया देऊन कृषी विज्ञान केंद्र वाशिम व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर यांचे कौतुक केले.

श्रीकृष्ण बावस्कर, अक्षय गिरी, शिवाजी वाघ व आदित्य देशमुख यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना करीता अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवर तथा शेतकरी यांचे आभार डॉ एस के देशमुख यांनी केले.

# नाशिक ग्रामीण पोलीसांच्या वर्षभरात ७ हजार कारवाया

## ३० कोटींचा मुद्देमाल हस्तगत : विशेष पथकांची निर्मिती

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** गत वर्षात जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांचे मार्गदर्शनाखाली, जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी अवैध व्यवसायविरोधी अभियान राबवत वर्षभरात ७ हजार कारवायांमध्ये तब्बल ३० कोटींचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दि. १ जाने ते ३१ डिसें २०२३ या काळात नाशिक ग्रामीण पोलीसांनी अवैध व्यवसाय विरोधात एकूण ६९३९ धाडी टाकून ९३८७ इसमांविरुद्ध कारवाया केल्या. गुटखा ६१७ केसेस, ९३९ आरोपी,
१५,२१,८९,६०१ रु, मुंबई दारूबंदी कायदा ४९९३ केसेस, ५१९२ आरोपी, ८,२६,११,८३१ रु, महाराष्ट्र जुगार कायदा १०५१ केसेस, २८६४ आरोपी, २,०३,०,४०८ रु, जीवनावश्यक वस्तु कायदा १२४ केसेस, २०० आरोपी, ३,१०,५८,५२० रु, एन.डी.पी.एस. कायदा ५२ केसेस, ७५ आरोपी, ५१,१९,४३७ रु, भारतीय हत्यार कायदा १०२ केसेस ११७ आरोपी ३५ देशी बनावटीचे कट्टे, ४९ जीवंत काडतुसे, ६८ तलवार, २३ चाकू, १७ कोयते असे एकूण ६९३९ केसेस मध्ये २९,१३,६९,७९७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अवैध व्यवसायांची माहिती जनतेतून मिळावी म्हणून 'खबर' ही हेल्पलाइन सुरू करून ६२६२२५६३६३ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला. जनतेने या हेल्पलाइनला सकारात्मक प्रतिसाद देत आपल्या भागात चालणा-या अवैध व्यवसायांची माहिती पोलीसांपर्यंत पोहोचवली.

**विशेष पथकांची निर्मिती :** जिल्ह्यात वेगवेगळया भागात चालणा-या अवैध व्यवसायांचे उच्चाटन करण्याकामी नाशिक ग्रामीण पोलीसांनी आठ विशेष पथकांची निर्मिती केली. सदर पथके जिल्ह्यातील नाशिक ग्रामीण, निफाड, कळवण, पेठ, मनमाड, मालेगाव शहर, मालेगाव कॅम्प व मालेगाव ग्रामीण अशा ८ उपविभागात सोडण्यात आली. सदर पथकांनी त्यांना नेमून दिलेल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती काढून तसेच हेल्पलाईनवर प्राप्त झालेल्या माहितीवर कारवाई करत जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कंबर कसली.

**गुटखा निर्मूलनासाठी ग्रामीण पोलीसांची पाच सलग अभियाने :** तरुणाईस गुटख्याच्या विळख्यापासून वाचविण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी सामाजिक बांधिलकी जोपासत गुटख्याविरुद्ध सलग पाच महिने विशेष अभियान राबवून जिल्ह्यातील गुटख्याच्या समूळ



उच्चाटनासाठी सर्वोच्च पातळीवर प्रयत्न केले. सदर प्रकरणात कलम ३२८ भा.द.वि खाली गुन्हे नोंद झाल्याने एकूण ९३९ गुटखा विक्रेत्यांना जेलमध्ये जावे लागले.

**रणरागिनी पथके :** अवैध व्यवसायांचा बीमोड करण्यासाठी नेमलेल्या पथकांसोबतच ग्रामीण व विशेषतः दुर्गम भागातील हातभट्टी व्यवसायांचे निर्मूलन करण्यासाठी महिला पोलीसांची तीन पथके कार्यरत केली होती. सदर महिला अंमलदारांनी जिल्ह्यातील दरी, डोंगर, नद्या, ओढे व नाले पिंजून काढत हातभट्टीची दारू तयार करणारे अड्डे उध्वस्त केले. महिला पोलीसांच्या सदर कामगिरीचे ग्रामीण भागातील महिलांनी विशेष कौतुक केले. काही भागात ग्रामीण भागातील महिलांनी रणरागिनी पथकातील महिला अंमलदारांचे हळदी-कुंकवाने औक्षण केले.

**बळीराजा हेल्पलाईन :** नाशिक जिल्हा हा शेतीप्रधान जिल्हा आहे. या भागातील द्राक्ष, डाळिंब, कांदा, टोमॅटो व भाजीपाला प्रसिद्ध असल्याने बाहेरील व्यापा-यांनी शेतक-यांचा माल खरेदी करून त्यांना पैसे न देता त्यांची फसवणूक केल्याच्या अनेक तक्रारी पोलीस मुख्यालयाकडे प्राप्त होत होत्या. सदर बाब लक्षात घेऊन नाशिक ग्रामीण पोलीसांनी जिल्ह्यातील शेतक-यांना तकार करण्यासाठी काही महिन्यांपूर्वीच ६२६२ ७६ ६३६३ ही हेल्पलाईन सुरू केली. आजपर्यंत सदर हेल्पलाईनवर एकूण १५७ शेतक-यांनी आपली गाऱ्हाणी मांडली. यातील ६९ शेतकऱ्यांना रुपये ५५ लाख ७१ हजार ११९ रुपये एवढी फसवणुकीची रक्कम परत मिळवून देण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी मोलाची भूमिका बजावली.

**प्रकरणांच्या कालबद्ध निर्गतीवर भर :** नागरिकांनी मांडलेल्या तक्रारीची त्वरित दखल घेण्याच्या दृष्टीकोनातून व त्यांची विशिष्ट कालमर्यादेत निर्गती करण्याच्या दृष्टीकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी प्रकरणांच्या कालबद्ध निर्गतीवर भर दिला. यामुळे शेतक-यांना जमीन मोजणीसाठी लागणारे बंदोबस्त, चारित्र पडताळणी, पासपोर्ट, अर्ज चौकशी, पेट्रोल पंप, शस्त्र परवाने इत्यादी प्रकरणे मुदतीत निकाली काढून सर्व सामान्य जनतेस दिलासा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न नाशिक ग्रामीण पोलिसांनी केला आहे.

**खून व दरोड्याचे गुन्ह्यांचा सखोल व शास्त्रोक्त तपास :** जिल्ह्यातील खून व दरोड्याचे गुन्ह्यांना नाशिक ग्रामीण पोलीसांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. सन २०२३ मध्ये जिल्ह्यात एकूण ७६ खूनाचे गुन्हे नोंद झाले. यातील ७५ गुन्हे उघडकीस आणण्यात ग्रामीण पोलीसांना यश मिळाले आहे. यावर्षी जिल्ह्यात दरोड्याचे १६ गुन्हे घडले असून हे सर्व १६ गुन्हे उघडकीस आणण्यात नाशिक ग्रामीण पोलीसांना यश मिळाले आहे.

# त्सुनामीचा इशारा

आधुनिक केसरी

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी वाईट बातमी समोर आली आहे. जपानमध्ये ७.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला आहे. त्यानंतर आता त्सूनामीचा इशारा देण्यात आला आहे. समुद्रात सुनामीच्या लाटा उसळत आहेत. त्सुनामीच्या लाटा जपानच्या किनारपट्टीवर आदळल्या आहेत. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी उत्तर मध्य जपानमध्ये ७.५ रिश्टर स्केलचा भूकंप नोंदवला गेला. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, जपानच्या हवामान संस्थेने इशिकावा, निगाता आणि तोयामा प्रांताच्या किनारी भागात त्सुनामीचा इशारा दिला आहे. हवामान संस्थेच्या म्हणण्यानुसार, भूकंपामुळे इशिकावा प्रांतातील नोटोपर्यंत ५ मीटर उंचीच्या लाटा उसळत आहेत. जपानमध्ये त्सुनामीच्या लाटा उसळण्याची भीती असताना  किनारपट्टी भागात राहणाऱ्या लोकांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लोकांमध्ये घबराट पसरली आहे. त्सुनामीग्रस्त भागात बचाव पथकही पोहोचले आहे. जपानच्या किनारपट्टीवर भूकंपाच्या केंद्रापासून 300 किलोमीटर आत धोकादायक त्सुनामीच्या लाटा येण्याची शक्यता आहे. जेएमएने सांगितले की, जपानच्या मुख्य बेटाच्या होन्शूच्या जपानच्या समुद्रावरील नोटो प्रदेशात स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी 4:06 वाजता 5.7 तीव्रतेचा भूकंप जाणवला. यानंतर दुपारी 4:10 वाजता 7.6 रिश्टर स्केलचा भूकंप, 4:18 वाजता 6.1 रिश्टर स्केलचा भूकंप, 4:23 वाजता 4.5 रिश्टर स्केलचा भूकंप, 4:29 वाजता 4.6 रिश्टर स्केलचा भूकंप आणि दुपारी 4:29 वाजता भूकंपाचा धक्का बसला. त्यानंतर लगेचच ६.२ रिश्टर स्केलचा दुसरा भूकंप झाल्याचे यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने सांगितले. इमारती मजबूत भूकंप सहन करू शकतील याची खात्री करण्याच्या उद्देशाने जपानमध्ये कठोर बांधकाम नियम आहेत. मार्च 2011 मध्ये ईशान्य जपानमध्ये आलेल्या भूकंपानंतर जेव्हा त्सुनामी आली तेव्हा सुमारे 18,500 लोकांचा मृत्यू झाला होता. अनेक जण बेपत्ता झाले. 2011 च्या त्सुनामीने फुकुशिमा अणु प्रकल्पातील तीन अणुभट्ट्याही उद्ध्वस्त केल्या होत्या. ही जपानची युद्धानंतरची सर्वात वाईट आपत्ती होती आणि चेरनोबिल नंतरची सर्वात गंभीर आण्विक दुर्घटना होती. त्याच वेळी, मार्च 2022 मध्ये, फुकुशिमाच्या किनारपट्टीवर 7.4 तीव्रतेच्या भूकंपाने पूर्वेकडील जपानच्या मोठ्या भागांना हादरवून सोडले आणि तीन लोकांचा मृत्यू झाला.

# हॅपी न्यू इअर 2024!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**दिवस, महिने आणि वर्षामागून वर्षे जात आहेत! बघता बघता एकविसाव्या शतकातील २३ वर्षे संपली! मागे वळून पाहतांना आपण एवढे पुढे आले आहोत असे आश्चर्याने म्हणतांना आपण अवाक होऊन जातो! अथक, अविश्रांत काळाने युगे युगे आपल्या उदरात गडप करून मस्त उद्याचा सूर्योदय पाहण्यासाठी दात काढतोय! एक इंग्रजी वर्ष संपून उद्या २०२४ या नव्या वर्षाचा सुर्योदय होणार आहे. आजकाल सेलिब्रेशनने सगळीकडे धुमाकूळ मांडला आहे. एखादी गोष्ट आपण का करतो?**

याचा साधक बाधक विचार न करता केवळ कुणीतरी जल्लोष करतोय म्हणून आपण सुद्धा जल्लोष करतो आहोत. आपला देश तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो.
नवे वर्ष संपतांना आपण काही सोडून दिले पाहिजे आणि उद्या नववर्षाच्या सूर्योदयाच्या स्वागताला सज्ज राहिलं पाहिजे. काल बऱ्याच जणांनी थर्टी फर्स्ट मोठ्या जल्लोषात साजरा केला असेल आणि रात्री १२ वाजता या नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी पार्टी सुद्धा केली असेल. हे सगळे सुरु असतांना आपण काय आणि कशासाठी करतोय? याची जाण आणि भान असणे काळाची गरज बनली आहे.
अलीकडच्या दहा वर्षात जगाने खूपच वेगाने कात टाकली आहे. मोबाईल आणि इंटरनेटमुळे संपूर्ण जग अगदी मुठ्ठीत आल्याचा भास झाला आहे. खरंच जग आपल्या मुठ्ठीत आलं आहे का? याचा आपण खोलवर जाऊन विचार करणार आहोत का? आत्तापर्यंत माणसाने आपल्यात अनंत बदल करून तो आज स्वतःच्या ज्ञानकर्माच्या बळावर चंद्र-मंगळ आणि आता चक्क सूर्यावर स्वारी करायला निघालाय! निश्चितच ही माणसाने मोठी उपलब्धी साधली आहे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. परंतु असे होतांना मूलतः माणूस कुठं आहे? माणसाच्या समस्या वाढल्या आहेत की कमी झाल्या आहेत? माणसाकडे भरमसाठ साधनं असताना त्याला सुख हुलकावणी देतंय की सापडलंय? याचा पण विचार व्हायला हवा. तसं पाहिलं तर, सुख कशात आहे हेच मुळी आपण समजून घेताहोत का? खरं सुख शांती, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सुहृदयता यात असून शांत पुरेशी झोप लागणे हे सर्वात मोठे सुखी माणसाचे लक्षण आहे. आज आपण नवीन वर्षात आलो म्हणजे काय झाले? कालच्या सारखा आजचा दिवस पूर्वेकडूनच उगवला. तशीच सकाळ झाली. तसेच उशिरा उठलो. असे असतांना आपण मागील वर्षात काय केले? काय करणे सुरु ठेवले पाहिजे आणि काय करणे थांबवले पाहिजे? याची नोंद आपल्याकडे आहे का? ज्यांच्याकडे असेल त्यांनी त्याची पक्की खुणगाठ बांधून ठेवावी. असे करतांना आजपासून सुरु होणारे वर्ष मी कसे घालवणार आहे? याविषयी थोडे लिहून ठेवावे.
मागील वर्षी मी वर्षभरात ४८ लेख लिहिण्याचा संकल्प केला होता आणि तो मी पूर्ण केला आहे, परंतु माझ्याकडून एकसुद्धा पुस्तक प्रकाशित झाले नाही याची खंत आहे. या २०२४ वर्षात मी दोन पुस्तके, २५ पुस्तक परीक्षणे आणि ४८ लेख लिहिण्याचा संकल्प करत आहे. त्याचबरोबर नवोदित लेखकांची पुस्तके वाचून त्यावर लिहिणार आहे. हे इथे लिहिण्याचे कारण म्हणजे आपण काय करतो आणि काय करायला पाहिजे? याची आपण नोंद आपल्याकडे असायला हवी. हा लेखक काय करतो अन काय करणार आहे? याची माहिती वाचकांना व्हायला हवी. तसेच एक शिक्षक या नात्याने आपल्या तासिका नियमित घेऊन विद्यार्थ्यांना नित्य प्रेरित करणार आहे! या संदर्भाने सातत्याने कार्यरत राहणार आहे. त्याशिवाय या वर्षात मला संगीत शिकायचे आहे. संवादिका वाजवून गायन करण्याची क्षमता मला मिळवायची आहे. त्यासाठी मी नियमित संगीत वर्गाला जाऊन एक संवादिनी घेणार आणि शिकणार आहे. असे नवनवे संकल्प करतांना आपला भोवताल सुद्धा तेव्हढाच आनंदी आणि प्रसन्न ठेवला पाहिजे या न्यायाने माझ्या सहकारी आणि सर्वच मित्रांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी एक-दोन ऑनलाईन योगा-प्राणायाम शिबिरे घेणार आहे.  वाचक माय-बापहो, येणाऱ्या वर्षात आपण काय करणार आहोत? याची नोंद नक्की ठेवा. हे करतांना आपल्या माणसांची आणि भोवतालची काळजी घेण्याचा संकल्प करा. माझे अनेक वाचक मित्र जे मला लेख वाचल्यानंतर कॉल करून प्रेरणा देत असतात, बरेच वाचक मिडीयावर सविस्तर प्रतिक्रिया देत असतात. त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद! मित्रहो, आपणही काहीतरी लिहिण्याचा, वाचण्याचा आणि इतरांना प्रेरणा देण्याचा संकल्प करा. असे करण्यामागे स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीही आहेत. आपण जगाला काय देतो? याची नोंद सृष्टी आणि जग नित्य ठेवत असते आणि त्याच्या बदल्यात आपल्याला लाख पटीने मिळत असते. आनंद, आरोग्य, सद्विचार,



सन्मान वाटत राहिलो की; आपल्याला कशाचीच गरज भासत नाही. लोक हसवले की आपण सहजच हसतो. घरोघरी जर सुगंधाची पेरणी केली तर आपल्या हातांना अत्तराचा दरवळ आल्याशिवाय कसा राहील! हा जीवनाचा साधा-सरळ नियम आहे आणि त्याचा अंगीकार मी करणार आहे! मागील वर्ष मज्जेत गेले. अनेक कटू-गोड अनुभव आले. भूतकाळातील खडतर दिवस हे वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी नेहमीच पथदर्शी असतात. त्रास कुणाला नाही झाला? जे समाजात पुढे जाण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्या चुकाकडे समाज बारकाईने पाहत असतो, ही मोठी महत्वपूर्ण बाब आहे.  त्यासाठी वैश्विक विचारांची लेखणी-वाणी घेऊन फिरणाऱ्या माणसाने विश्वाचाच विचार करत राहावा. जात-धर्म-पंथ या सूक्ष्म बाबी फार काही लक्षात न घेता आपला वैश्विक बाणा अखंड चालूच ठेवावा लागेल! असे झाल्यास आपले काम लोकांच्या कमी येईल!
मित्रहो, आज आपण सगळेच खूप जवळ आलो असलो तरी स्वतःपासून खूप दूर जात आहोत. त्यासाठी आज नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी काही महत्वपूर्ण संकल्प करा. एकविसाव्या शतकातील हे २४ वे वर्षे आहे. त्यासाठी संख्या संकेत कोश ग्रंथात २४ या आकड्यावर विविध प्रकारचे विश्लेषण आले आहे. त्यातील चोवीस रत्ने, चोवीस मुद्रा, चोवीस बुद्ध, चोवीस शब्द गुण, चोवीस जैन तीर्थंकर, दत्तात्रयांचे चोवीस गुरु, चोवीस अवतार, चोवीस एकादशी, चोवीस अनु, चोवीस शौर्य इत्यादींचा उल्लेख आहे, परंतु एवढ्या सगळ्या बाबीची नोंद इथे घेणे शक्य नाही. त्यासाठी न्यायशास्त्रातील चोवीस गुणांचा अंगीकार आपण आपल्या जीवनात करायला हवा. रुप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द, बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, दोष, प्रयत्न, धर्म, अधर्म व संस्कार इत्यादी चोवीस गुणांचे अवलोकन करून त्यातील किती महत्वपूर्ण गुण आपल्या जीवनात प्रत्यक्ष उतरवता येतील याचा नक्की विचार व्हावा. तेव्हा या ओठांनी चुंबुनि घेइन हजारदा ही माती अनंत मरणे झेलुन घ्यावी इथल्या जगण्यासाठी असा विचार मी पण करतोय आणि आपण पण करा आणि हे वर्ष मोठ्या जोमाने निरोगी, शांततेत आनंदाने जावे अशी मी प्रार्थना करतो आणि तुम्ही पण करा! हॅपी न्यू इअर 2024!

# ज्ञान हे कधीच न संपणारे वैभव



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीव सृष्टीवर ज्ञान हि एकमेव  संपत्ती अशी आहे कि ज्याला  भय, भिती, चिंता, मोह , स्वार्थ, यापासून कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होत नाही. अनादी काळापासून आतापर्यंत च्या त्या त्या युगातील कालखंडाचा आतापर्यंत अगदी बारकाईने विचार केला तर आपल्या प्रकर्षाने हेच लक्षात येईल कि मानवी जीवनाचा मुख्य उदेश काय असतो.आपला जन्म नेमका कशासाठी झाला आहे. जन्म उदेश न समजल्यामुळे जीवन सार्थक लागत नाही उलटपक्षी जीव खरया अर्थाने दुय्यम असणार्या संसारातील भौतिक अशा संसधानाच्या अर्जानात अडकून पडतो. शेवटच्या क्षणी भौतिक संसाधन निरर्थक वाटतात पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.मुख्य जीवन उदेश पासून मग आपण अलगद दुरच राहतो.**

ज्याला वास्तविक जीवन उद्देश समजला तो भौतिक संसाधनात न अडकता निश्चितच ज्ञान अर्जित करेल.ज्ञान हे कधीच चोरीला जात नाही. त्याची कोणत्याही परिस्थितीत लूट देखिल होत नाही त्याच बरोबर ते कोणी हिरावून हिसकावून घेऊ शकत नाही.अथवा ते नष्ट देखील नाही.ज्ञानाच्या बाबातीत कोणत्याही प्रकारच किंतू परंतु तर नसतच ज्ञान हे अमर असल्याने ज्ञानाच्या संदर्भात कोणतीही शंका कुशंका आशंका मनात निर्माण होत नाही. ज्ञान सोडता इतर कोणतीही संपदा हि लुटली जाऊ शकते किंवा ज्यांचं कडे बळ आहे त्याला ती मिळू शकते शक्तिशाली व्यक्ती ती हिरावून घेऊ शकतो. मात्र ज्ञान हि एकमेव संपदा आहे जी जगातील कोणत्याही प्रकारच बळ शक्ती वापरून अथवा भय भिती दाखवून दडपशाहीच्या माध्यमातून इतरांकडून लूटता येत नाही.ज्ञानाची लूट होत नाही. ज्या पद्धतीचा जीव असतो त्यानुसार त्या पद्धतीच वैभव अर्जित करण्यासाठी तो जीव धडपडत करत असतो. अथवा प्रयत्नांची पराकाष्ठा करत असतो.जीवनात काय मिळवलं पाहिजे हे ज्या त्या व्यक्तीच्या ज्ञान सामर्थ्यावर अंवलबुन असत. चांगले वाईट दिवस आयुष्यात येणं जाणं हे नैसर्गिक आहे.याला कोणीही व्यक्ती अपवाद नाही.भौतिक संसारात बदल हा सृष्टीचा नियम आहे.कितीही मोठं साम्राज्य असेल त्याला चढ उतार येणार हे निश्चित आहे.ज्ञान हि शाश्वत संपत्ती असून ते कधीही न संपणारे वैभव आहे.तर धन,द्रव्य, सत्ता, संपत्ती,पद पैसा मोठेपणा हे भौतिक वैभव असून ते क्षणिक असतात.भौतिक वैभव कितीही मिळाल अथवा मिळवलं तरी एक वेळ त्याचा अंत हा निश्चित असतो.म्हणजे ते नश्वर आहे.वेळ काळ परस्थिती अथवा कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात न येणार वैभव जर या सृष्टीवर कोणतं असेल तर ते फक्त ज्ञानच आहे.इतर वैभव हि काळानुसार बदलतात. काळ वेळ बदलली तरी देखील कोणत्याही काळात ज्ञानाच वैभव अविनाशी असत.सृष्टीवर अनाशिवंत अस काही जर असेल तर ते ज्ञान असून ते  शाश्वत असतं म्हणजे ते काही काळ नंतर संपुष्टात येत नाही अथवा नष्ट होत नाही म्हणून सृष्टीवर चिरकाल टिकणारे वैभव ज्ञान असल्याने हेच अविनाशी वैभव आपल्याला अर्जित करता आलं पाहिजे.संसार हा मायेचा महा सागर असून जीव हा मायेचा सारथी असतो.संबध जीवन आपण भौतिक साधन अर्जित करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करतो.तरी देखील नानाविधी प्रयत्न करून अर्जित केलेली कोणतीही संपदा चिरकाल टिकत नाही.त्याच बरोबर जीवात्मा सृष्टीचा निरोप घेताना कोणतीही संपदा सोबत जात नाही अथवा तशी सुविधा देखील उपलब्ध नाही.पण ज्ञान रूपी अर्जित संपदा सृष्टीवर पिढ्या न पिढ्या अमर राहते.ज्ञानाची संपदा हि फक्त आपल्याशी निगडित व्यक्ति पुरती मर्यादित राहत नाही.ज्ञान हे आपले आप्तेष्ट नातेवाईक यांच्या शिवाय सृष्टी वरील इतर अनेक जीवांसाठी उपयोगी ठरत असते.लोक उपयोगी हितार्थ आणि चिरकाल टिकणारे वैभव ज्ञान असल्याने हेच वैभव जीवन हितार्थ दूरदृष्टी ठेवून अर्जित करता आलं पाहिजे.दैनंदिन जीवनात कर्म करत असताना ज्ञान अर्जित केलं तर तर सृष्टी वरील अविनाशी वैभव आपल्याला सहजगत्या अर्जित करता येत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# खा. हेमंत गोडसे यांच्या हस्ते विकासकामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** शासनाच्या विविध हेडमधुन खासदार गोडसे यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून पुर्ण झालेल्या चोवीस विकासकामांचे भूमिपुजने तर सतरा विकासकामांचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. विकासकामांचे भूमिपुजन आणि लोकार्पण झालेले सर्व कामे इगतपुरी तालुक्यातील वाडीवऱ्हे गटातील आहेत. खा. गोडसे यांनी विशेष प्रयत्न करून गावस्तरावर मुलभूत सोयी – सुविधा उपलब्ध करून दिल्याने वाडीवऱ्हे गटातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. खा. गोडसे यांनी वाडीवऱ्हे गटाचा दौरा केला असुन दौऱ्यादरम्यान खा. गोडसे यांच्या हस्ते शेणीत, पिंपळगाव घाडगा, पिंपळगाव डुंकरा, साकुर फाटा, भरवीर खु., कवडदरा, घोटी खु., साकुर, नांदगाव, कृष्णानगर, जानोरी, नांदुरवैद्य, बेलगाव, कुऱ्हेगाव, गोंदे, पाडळी आणि मुकणे या गावांमधील पुर्ण झालेल्या सतरा विकासकामांचे लोकार्पण तर नव्याने सुरू होणाऱ्या चोवीस विकासकामांचे भुमीपूजने संपन्न झाले. या दरम्यान खा. गोडसे यांच्या हस्ते विविध गावांमधील शिवसेनेच्या शाखांचे उदघाटने करण्यात आली. यावेळी शिवसेनेच्या नावाचा जयघोष करत शिवसैनिकांनी परिसर दणाणून सोडला. या प्रसंगी शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख माजी आमदार काशिनाथ मेंगाळ, जिल्हाप्रमुख अनिल ढिकले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पुजा धुमाळ, जिल्हा संघटक योगेश म्हस्के, उपजिल्हा प्रमुख रघुनाथ तोकडे, तालुकाध्यक्ष संपत काळे, देविदास जाधव, रमेश गायकर, विलास आडके, बाळा गव्हाणे, कुंडलिक धांडे, या मान्यवरांसह मालन वाघचौरे, देविदास देवगिरे, अंजना जोशी, उषा शेकडे, ललिता काजळे, अर्जुन भोर, संगिता जाधव, विनोद जाधव, हिरा कुकडे, अश्विनी भोईर, मनिषा शेंगटे, अनिता मोरे, मनिषा गायकर, शुभांगी गुळवे, गौरव गाडे, संगिता धोंगडे, निर्मला धोंगडे, खंडेराव धांडे, बाळु आमले, हिरामण राव, भास्कर राव, दादु शरद सोनवणे, शोभा नाठे आदि




सरपंच, उपसरपंच उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोपीनाथ गायकवाड, देविदास जाधव, जगन घाडगे, शरद वाकचौरे, शंकर पुंडे, ईश्वर रोंगटे, रोहिदास कोकणे, सुनिल पागेरे, भाऊसाहेब मुसळे, पप्पु धोंगडे, देविदास राव, माधव नाठे आदि शाखा प्रमुखांनी विशेष परिश्रम घेतले.

# आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते विकासकामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील इंदापूर, बाजार सावंगी, कनकशीळ, कानडगाव आदी ठिकाणी आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते गुरुवारी विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. आमदार सतीश चव्हाण यांनी खुलताबाद तालुक्यातील इंदापूर येथे गावअंतर्गत सी सी रोड करण्यासाठी 25-15 योजनेअंतर्गत 10 लक्ष, बाजार सावंगी येथे 15 लक्ष, कनकशीळ येथे 20 लक्ष, कानडगाव येथे मारोती मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी 5 लक्ष असा एकूण 50 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील विकास कामे पूर्ण झाली असून गुरुवारी या कामाचे लोकार्पण आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, खुलताबाद तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी विधी मंडळात आवाज उठवला. यातील काही प्रश्न मार्गी लावल्याचे समाधान आहे. खुलताबाद तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरावस्था लक्षात घेता सदरील तालुक्यातील रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी मी शासनस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करीत होतो. अखेर माझ्या या प्रयत्नाला यश आले असून नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांमध्ये कनकशिळ रस्ता ग्रामा 20 किमी 0/00 ते 2/500 चे नळकांडी पुलासह मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी 2 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. लवकर हे काम सुरू होईल असे देखील आमदार सतीश चव्हाण यांनी सांगितले.याप्रसंगी खुलताबाद राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल चव्हाण, महिला तालुकाध्यक्ष सुनीताताई आहेवाड, माजी सभापती महेश उबाळे, शहराध्यक्ष गजानन फुलारे, ज्ञानेश्वर दुधारे, विनोद जाधव, प्रकाश नलावडे, भगवान कामठे, मिठु महालकर, अजिनाथ साळुंके, प्रवीण निकम, केशव जाधव, श्री.किशोर निकम, जितेंद्र निकम, अशोक निकम, इद्रिस पटेल, भाऊसाहेब जाधव, सरपंच अप्पाराव नलावडे, वसंतराव नलावडे, सागर काटकर, कांताराम आघाडे, बालू कामठे, विलास तांगडे, विठ्ठल कामठे, रामहरी पवार, संदीप कामठे, ज्ञानेश्वर मातकर, माजी सरपंच नारायण जाधव, मधुकर जाधव, मधुकर जाधव, सरपंच कचरू साबळे, सुरेश जाधव आदींची उपस्थिती होती.

# निमंत्रकपदी माजी आमदार सुदर्शन निमकर यांची नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**राजुरा :** तालुक्यातील महाराष्ट्र- तेलंगाना सीमावर्ती भागातील ग्रा.पं. देवाडा क्षेत्रातील श्री सिद्धेश्वर देवस्थान मंदिराच्या जतन दुरुस्ती व पुनरनिर्माण कामाकरीता राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीरभाऊ गुनगंटीवार यांच्या निर्देशानुसार 14 कोटी 93 लक्ष 99 हजार 753 रु. निधी 13 जून 2023 रोजी प्रशासकीय मान्यतेसह मंजूर केला होता. सदर काम सुरू करण्यासंबंधी निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश दिलेला असुन प्रत्यक्ष या कामाचा शुभारंभ सुद्धा लवकर होणार आहे. या मंदिराचे काम दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व दिलेल्या वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून व बांधकामात येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्याकरिता शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शा.नि.क्रमांक 2023 प्रकरण क्रमांक 276/सां.का. 3, दिनांक 20 डिसेंबर 2023 रोजी च्या शासन निर्णयानुसार समिती गठित करून माजी आमदार तथा श्री तिरुपती बालाजी देवस्थान चुनाळा चे अध्यक्ष सुदर्शन निमकर यांची प्रमूख निमंत्रकपदी नियुक्ती करण्यात आली असून, या समितीवर अशासकीय सदस्य म्हणून श्री सिद्धेश्वर देवस्थान विश्वस्त कमेटीचे सचिव श्री किरण चेनवेनवार, ग्रामपंचायत देवाडा चे सरपंच श्री शंकर मडावी यांची निवड करण्यात आली आहे. समितीवर केलेल्या निवडीचे श्री सिद्धेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ डेवाडा तथा परिसरातील जनतेनी ना.सुधीरभाऊ यांचे अभिनंदन केले आहे. जागृत व प्रसिध्द अशा या श्री महादेवाच्या मंदिराचा जिर्णोध्दार व्हावा व या तीर्थस्थळी उत्तम पर्यटन स्थळ निर्माण व्हावे याकरिता माजी आमदार सुदर्शन निमकर यांनी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार व पुरातत्व विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता हे विशेष. या समितीच्या पदसिध्द अध्यक्षपदी राजुरा चे उपविभागीय अधिकारी राहाणार आहे. तसेच या समितीमध्ये पदसिध्द सदस्य म्हणून तहसीलदार राजुरा, वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर स्टेशन, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग राजुरा व तसेच पदसिध्द सचिव म्हणून सहाय्यक संचालक, पुरातत्त्व विभाग, नागपूर यांची निवड करण्यात आली आहे. या ऐतिहासिक अशा पवित्र मंदिराचे भूमिपूजन भव्य स्वरूपात व्हावे अशी जनतेची ईच्छा असल्यामुळे त्वरित भूमिपूजनाची तारीख निश्चित करण्याची विनंती ना. सुधीरभाऊ गुनगंटीवार यांचेकडे करण्यात आली आहे. महाशिवरात्री च्या पावन पर्वावर हजारो भाविक दर्शनासाठी या मंदिरात येत असतात. आता गेल्या अनेक वर्षापासून भग्नावस्थेत व दुर्लक्षित असलेल्या या ऐतिहासिक अशा पवित्र धार्मिक स्थळाचा कायापालट ना. सुधिरभाऊ मुनगंटीवार यांच्या दूरदृष्टी मुळे होऊन, उत्तम असे पर्यटन स्थळ निर्माण होणार आहे. या कामाकरिता 15 कोटी रु. मंजूर करून निधी वितरित केल्याबद्दल परिसरातील जनतेनी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे.

# नवीन मोटार वाहन कायद्याच्या विरोधात ट्रकचालकांचा एल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्याच्या विरोधात नागपुरातील भंडारा रोड, अमरावती रोडवर सकाळपासून ट्रकचालकांनी रस्ता रोको सुरू केले आहे. ट्रक चालकांनी काही भागांत टायर जाळल्याने तणाव निर्माण झाला होता. अमरावती मार्गावर पोलिसांनी बंदोबस्त वाढवून वाहतूक सुरू केली, परंतु भंडारा रोडवरील वाहतूक ठप्प पडल्याने सर्वसामान्यांना प्रचंड मनःस्ताप होत आहे. केंद्र सरकारने आणलेल्या नवीन मोटार वाहन कायद्याला मोठ्या प्रमाणात नागपुरातही विरोध होत आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी सकाळपासून नागपूरसह राज्यातही ठिकठिकाणी ट्रकचालक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. ट्रक चालकांकडून कुठे चक्का जाम तर कुठे रस्त्यावर टायर पेटवले जात असल्याने अनेक महामार्गांवरील वाहतूक ठप्प पडली आहे. केंद्र सरकारने आणलेल्या नवीन वाहन कायद्यानुसार यापुढे अपघातास जबाबदार ट्रकचालकास दहा वर्षांच्या शिक्षेची तरतूद केली आहे. सोबतच सात लाख रुपये दंडदेखील आकाराला जाणार आहे.कायद्याच्या विरोधात नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्गावर सकाळपासून ट्रक चालकांनी चक्काजाम केले. या कायद्यात वाहनचालक खासकरून ट्रकचालकांविरोधात एकतर्फी कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचा आंदोलकांचा आरोप आहे.

# जय श्रीरामच्या जयघोषात मंगल अक्षता कलशाची शोभायात्रा..!

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** आयोध्या येथे २२ जानेवारी २०२४ रोजी भव्य दिव्य श्री राम मंदिरात राम ललाची प्रतिष्ठापना हा ऐतिहासिक समारंभ संपन्न होत आहे.या ऐतिहासिक समारंभाचे निमंत्रण देण्यासाठी संपूर्ण देशभर आयोध्येतून पवित्र पूजीत अक्षता कलाशाचे आगमन झाले आहे.याच अक्षता कलाशाची शनिवारी माळशिरस तालुक्यातील पिलीवच्या मुख्य पेठेतून वाजत गाजत शोभायात्रा काढण्यात आली.प्रभू श्रीरामाची प्रतिमा असलेली टुमदार पालखी, हलगी व ढोल ताशांचा गजर,शंखांचे वादन,'जय श्रीराम'चा जयघोष अशा आनंद आणि उत्साहपूर्ण राममय वातावरणात अयोध्येतील रामलल्लांची मूर्ती असलेल्या मंदिराच्या गर्भगृहात पूजन करून आलेल्या अक्षतांचे पूजन करीत एसटी स्टँड पासून ते हनुमान मंदिरापर्यंत भव्य मंगल कलश यात्रा काढण्यात आली.यावेळी पिलीव पंचक्रोशीतील महिला डोक्यावर अक्षता कलश घेऊन यात्रेत सहभागी झाल्या होत्या.यात्रेचे पिलीव पेठेतील दुकानदारांकडून ठिकठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.



# तिमिरातुनी... तेजाकडे !



पंकज वसंत पाटील
मो. 9850430579

आधुनिक केसरी

**१८ व्या शतकात भीषण अज्ञान, कर्मकांड वर्णभेद, जातीभेद, बालविवाह, केशवपन सतीची चाल इत्यादी व्याधी महाव्याद्यांनी महाराष्ट्र व संपूर्ण देश घातलेला होता. स्त्री समाजाची स्थिती पाहून तर अंगावर शहारे यावेत असाच तो काळ होता. तेव्हा स्त्री जन्मच अशुभ मानल्या जाई. माणूस म्हणून तिला मन आहे, स्वतंत्र विचार करण्याची, आचार विचारांची आकांक्षा आहे याचे भान पुरुष तेव्हा समाजाला नव्हते. अशा काळात ३ जानेवारी १८३१ रोजी सावित्रीबाईंचा जन्म झाला. सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव हे सावित्रीबाई फुले यांचे माहेर.**

शिवशाही ते पेशवाई पर्यंत मान्यताप्राप्त असलेल्या नेवसे पाटील घराण्यातील खंडोजी नेवसे पाटील यांच्या सावित्रीबाई कन्या आहेत. गुणसंपन्न असलेल्या सावित्रीबाईं लहानपणापासूनच धीट आणि दयाळू होत्या. सन १८४० मध्ये त्यांचे ज्योतिबा फुले या युगप्रवर्तकाशी लग्न झाले आणि एका प्रवर्तक युगाचा प्रारंभ झाला.
महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा कालखंड म्हणजे १९ व्या शतकातील अव्वल इंग्रजी कालखंड स्त्री स्वातंत्र्य व समानता हा विषय एक वेड्याची कल्पना ठरावी अशी तेव्हा अवस्था होती. स्त्री शिक्षणाचा भारतातील पहिला प्रयोग ज्योतिबांनी आपल्या शेतावरील आंब्याच्या झाडाखाली केला. सावित्रीबाई आणि सगुणाबाई क्षीरसागर, ह्या त्या प्रयोगशाळेतील पहिल्या विद्यार्थ्यांनी होय. महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंना फक्त शिकविलेच नाही तर शिक्षिका बनविले.
सावित्रीबाई शिक्षिका झाल्यावर १९ व्या शतकातील महाराष्ट्रात व भारतदेशात नाव घेण्यासारख्या ज्या समकालीन स्त्रिया आढळतात त्यामध्ये सावित्रीबाई फुले यांचे कार्य तुलनेने कितीतरी पटीने मोलाचे व क्रांतिकारक असे आहे म्हणूनच त्या भारताच्या समाज क्रांतिकार्यातील आद्य क्रांतिदेवता ठरतात.
महात्मा फुलेंनी विद्येचे महत्त्व ओळखून स्त्री शिक्षणात सर्वश्रेष्ठ स्थान दिले पुरुषांपेक्षाही स्त्रीच्या शिक्षणाला विशेष महत्त्व आहे हे त्यांनी अचूक ओळखले व सन १८४८ मध्ये बुधवार पेठेतील भिड्यांच्या वड्यात महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा सुरू केली.
वर्ण, जाती आणि विषमता या रोगांचे मुळापासून उच्चाटन करण्यासाठी विद्या हेच रामबाण औषध असल्याचे सावित्रीबाई आणि ज्योतिबा यांच्या लक्षात आले होते म्हणूनच त्यांनी शूद्र-अतिशुद्रांसाठी शाळा चालू करून लढ्यास सुरुवात केली. सावित्रीबाईंच्या शाळेत शिकवण्याच्या कार्याचा आरंभ झाला.
यापूर्वी महाराष्ट्र किंवा अन्य राज्यात एकही भारतीय स्त्री शिक्षिका म्हणून काम केल्याचे इतिहासात उदाहरण नाही. सावित्रीबाई ह्याच भारतातल्या आद्य भारतीय स्त्री शिक्षिका ठरतात. स्वकीयांबरोबर समाजाचाही प्रकार विरोध स्वीकारून अत्यंत प्रतिकूल वातावरणात फुलमाळ्याच्या बाईने शिक्षिका म्हणून इतर मुलींना शिकवावे हे आश्चर्यच होते. धर्मबुडवी, सटवी असे शिव्या शाप देऊन सावित्रीबाईंची निंदा नालस्ती सुरू झाली, एवढेच



नव्हे तर कित्येक लोकांनी सावित्रीबाईंच्या अंगावर दगड व खडे फेकण्यात आपली पुण्याई खर्च केली. हालअपेष्टा, निंदानालस्ती, शिव्या-शाप व व असंख्य संकटे त्यांनी कठोरपणे पचवली. सावित्रीबाई डगमगल्या नाहीत त्यांनी आपला समाजसेवेचा हा महायज्ञ सुरूच ठेवला. स्त्री समानतेचा हा भारतातील पहिला जाहीरनामा होता.
सावित्रीबाईंच्या एकदा नेहमीप्रमाणे शाळेत जात असताना एक धटिंगण त्यांच्या रस्त्यात आडवा येऊन उभा राहिला. शाळा बंद करण्याची त्याने धमकी दिली. त्याने अब्रू घेण्याचा पवित्रा घेतला, सावित्रीबाईंचे वाघिणीसारखे डोळे त्याच्यावर चकाकले, त्यांनी त्या धटिंगणास दोन थापडा दिल्या, या जबरदस्त प्रहाराने तो मुकाट्याने तोंड लपवून बाजूला गेला. तेव्हापासून सावित्रीबाईंना होणारा त्रास एकदम कमी झाला. महात्मा फुलेंप्रमाणेच सावित्रीबाईंचाही पुण्यात एक दरारा निर्माण झाला. बुद्धिमत्ता, विद्वत्ता व नीतिमत्ता याबाबतीत परिपूर्ण असलेल्या सावित्रीबाईंनी आपला ज्ञानयज्ञ यशस्वी करून देशासमोर एक नवा आदर्श निर्माण केला. त्यामुळे तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी सावित्रीबाईंच्या कार्याची प्रशंसा केली. फुले दंपत्याच्या या अलौकिक शैक्षणिक कार्याने इंग्रज सरकारचे सुद्धा लक्ष वेधले व त्यांचा एक अपूर्व असा सार्वजनिक बक्षीस समारंभ इंग्रज सरकारने पुण्यात पार पडला.
ज्योतीरावांच्या आणि सावित्रीबाईंच्या कार्याने हिंदुस्थानात मन्वंतर घडून आले तयामुळे नव्या युगाचा आरंभ झाला. म्हणूनच महात्मा ज्योतिराव फुले युगपुरुष आणि सावित्रीबाई फुले या युगस्त्री मानल्या जातात. १० मार्च १८९७ रोजी या युगस्त्रीचे महानिर्वाण झाले. जोतीने प्रज्वलित केलेली ज्योत अनंतात विलीन झाली. या स्फुर्तीनायिका नसत्या तर आपल्या माता भगिनींचे आयुष्य एवढे प्रगल्भ झाले नसते. क्रांतीज्योती, थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले जयंती निमित्त विनम्र अभिवादन !!!

# गुन्हेगारीमुक्त २५ गावे



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**सामाजिक सलोखा टिकून राहावा तसेच कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन व्हावे यासाठी पोलीस प्रशासन २४ तास सतर्क असते. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी आज गावागावांत पोलीस ठाणी बांधण्यात आली आहेत; मात्र या देशात आज अशीही पोलीस ठाणी आहेत ज्यांच्यात आजतागायत एकही गुन्ह्याची नोंद झालेली नाही, असे म्हटल्यास त्यावर कोणालाही विश्वास बसणार नाही; मात्र हे सत्य आहे. राजस्थानमधील बिकानेर परिसरातील अशी २५ गावे आहेत ज्यांतील एकही माणूस आजतागायत पोलीस ठाण्याची पायरी चढलेला नाही.**


या २५ गावांतील लोकप्रतिनिधींचा परिक्षेत्र स्तरावर सत्कार करण्यात येणार आहे. या गावातील लोकप्रतिनिधी, पंच, सरपंच गावातील गुन्हेगारी नियंत्रणासाठी आणि समस्या निवारण करण्यासाठी कशाप्रकारे प्रयत्न करतात, कोणती ध्येय धोरणे राबवतात, पोलिसांपर्यंत येण्याची लोकांना गरज का भासत नाही याचा पोलीस प्रशासन सध्या अभ्यास करत आहे. या अभ्यासातून ग्राम पातळीवर एक मॉडेल विकसित केले जाणार आहे. या मॉडेलची अन्य गावांतही अंमलबजावणी करून नागरिकांच्या समस्या गाव पातळीवर सोडवून पोलीसांवरील भार कमी करता येईल का यासाठी पोलीस प्रशासनाकडून प्रयत्न केले जाणार आहेत.
या २५ गावांतील कोणीही पोलीस ठाण्याची पायरी चढत नाही याचा अर्थ इथे गुन्हे घडत नाहीत किंवा नागरिकांच्या काही समस्याच नाहित असे नव्हे. याठिकाणी कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा समस्या प्रथम पंचायतीमध्ये येते. येथील ग्रामप्रमुख, सरपंच आणि वडीलधारी मंडळी दोन्ही पक्षाची बाजू नीटपणे ऐकून घेतात, त्या समस्येवर सविस्तर चर्चा करतात आणि ती समस्या सामंजस्याने सोडवतात. कोणाची चूक



असल्यास पंचायतीकडून गुन्हेगाराला शिक्षाही दिली जाते. वडीलधारी मंडळी आणि पंचांचा मान राखून गुन्हेगार शिक्षेचा स्वीकार करतो. त्यासाठी कोणीही दाद मागण्यासाठी पोलीस ठाण्यात किंवा न्यायालयात जात नाही. न्याय निवाडा करणाऱ्या येथील जेष्ठ मंडळींवर ग्रामस्थांचाही पूर्णपणे विश्वास आहे, त्यामुळे वर्षोनुवर्षे ही परंपरा अबाधित आहे. बिकानेर पोलिसांनी गावांतील या व्यवस्थेला 'पर्यायी विवाद निराकरण' असे नाव दिले आहे. या गावांची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे येथे मद्याची दुकाने नाहीत, पंचायत मंडळी त्यास परवानगी देत नाहीत तसेच या गावात धूम्रपान करण्यासही मज्जाव आहे. या गावातील सामंजस्य टिकण्यामागे या गावांत व्यसनांना घालण्यात आलेली बंदी हेसुद्धा प्रमुख कारण आहे,

प्राचीन काळात गावचा कारभार पाहण्याचे दायित्व गाव प्रमुखाकडे असे. ग्राम प्रमुखाला त्यावेळी 'ग्रामिणी' असे म्हटले जाई. गावातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याबरोबरच गावातील वरिष्ठ मंडळींच्या साहाय्याने गावातील समस्यांचे निराकरण करणे, तंटे मिटवणे, महसूल गोळा करणे तसेच विकास योजना राबवणे इत्यादी कामे ग्राम प्रमुख करत असत. पुढे मुघल काळात गाव पातळीवर कोतवाल, सरपंच, मुखिया इत्यादी पदे निर्माण झाली. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात ग्राम पातळीवर 'पाटील' हे नवीन प्रमुख पद सुरु केले. पुढे इंग्रजांनी देशात कायदेपद्धती आणून १८५८ च्या दरम्यान भारतात पोलीस खात्याची स्थापना केली. आज इतक्या वर्षांनंतरही देशातील २५ गावे पुरातन व्यवस्थेनुसार गावातील तंटे सोडवत आहे, गुन्हेगारांसाठी शिक्षापद्धत अवलंबत आहे आणि गावातील ग्रामस्थ न्याय निवाडा करणाऱ्या वरिष्ठ मंडळींवर तितकाच विश्वास दाखवत आहे ही बाब उल्लेखनीय आहे. यावरून प्राचीन न्यायपद्धती किती कल्याणकारी होती हे लक्षात येते. बिकानेर, श्री गंगानगर, हनुमानगढ आणि अनुपगढ येथील २५ गावांनी सर्वांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.
आजमितीला विज्ञानाने जशी प्रगती केली तसे गुन्हेगारांनाही गुन्हे करण्यासाठी वेवेगळे पर्याय उपलब्ध झाले आहेत. सर्वच क्षेत्रांतील गुन्हेगारीचा वाढता आलेख पाहता सध्याचे पोलीस दल अपुरे पडू लागले आहे. वाढत्या गुन्ह्यांचा अनाठायी भार पोलीस प्रशासनावर पडत आहे. प्रविष्ट झालेल्या गुन्ह्यांवर न्यायालयात संथगतीने चालणारा खटला गुन्हेगारांच्या पथ्यावर पडत आहे. वर्षोनुवर्षे खटले चालल्यावरही अखेर न्याय मिळेल कि नाही याची धास्ती प्रत्येक तक्रारदाराला असते. या सर्व प्रक्रियेमध्ये पीडित व्यक्तीचा किंवा तक्रारदाराचा प्रचंड वेळ आणि पैसा खर्च होतो. याशिवाय मनस्ताप सहन करावा लागतो तो वेगळाच.
गुन्हेगारीवरील नियंत्रण आणि न्यायप्रक्रियेतील गती ही सर्वच राज्यशासनांसमोरील मोठी आव्हाने आहेत. राजस्थानमधील २५ गावांनी आपली गावे गुन्हेगारीमुक्त करून अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली आहे. महाराष्ट्र सरकारनेही या २५ गावांचा आदर्श घेऊन नवीन वर्षात राज्यातील अधिकाधिक गावे गुन्हेगारीमुक्त करण्याचा प्रयत्न करावा !

# कुस्ती खेळामध्ये राजकीय आखाडा नकोच!



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**कुस्ती महासंघाबद्दल सरकारचा निर्णय योग्य दिशेने वाटचाल करीत आहे. भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात लैंगिक शोषणाचे आरोप असल्याने त्यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू रस्त्यावर उतरले होते आणि आताही याबाबतीत तटस्थ आहेत. नव्याने निवडणुक घेण्यात आली व दिनांक २१ डिसेंबर २०२३ ला महासंघाच्या निवडणूकीनंतर नवी कार्यकारिणी संजय सिंह यांच्या नेतृत्वात अस्तित्वात आली.परंतु या निवडणुकीत मोहरा फक्त संजय सिंह होते व संपूर्ण कमांड बृजभूषण शरण सिंह यांच्या हातात होती.**

त्यामुळे बृजभूषण शरण सिंह यांच्या प्रभावावरून नवा वाद निर्माण झाला आणि कुस्तीगीर आक्रमक झाले.या पार्श्वभूमीवर १५ ते २० वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धा घाईघाईने घेण्याची नवनिर्वाचित कार्यकारिणीने केलेली घोषणा त्यांच्या अंगलट आली आणि क्रीडा मंत्रालयाने रविवारी दिनांक २४ डिसेंबर २०२३ ला पुढील आदेशापर्यंत निलंबनाची कारवाई केली आहे.यामुळे कुस्ती खेळाडूंमध्ये न्याय मिळण्याच्या आशा उंचावल्या आहेत. कारण भारतीय महिला कुस्तीपटुंनी महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळवणूकीचे अनेक गंभीर आरोप लावले होते आणि यात बरंच काही सत्य होते. त्यामुळे त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले.यानंतर भारतीय कुस्ती महासंघाची निवडणूक झाली यातही लैंगिक छळवणूकीचा आरोप असलेले बृजभूषण शरण सिंह यांचे निकटवर्तीय संजय सिंह यांच्या माध्यमातून दिसून आले आणि याच्या विरोधात साक्षी मलिक,विनेश फोगट,बजरंग पुनिया सह अनेक पदक विजेते कुस्तीपटुंनी आक्रमक पवित्रा घेतला व आपले पदक सरकारला परत करण्याचा निर्णय घेतला व सरकार एकदम जागी झाली आणि लक्षात आले की ही बाब योग्य नाही.क्रिडामंत्रालय ताबडतोब एक्शनमोडमध्ये आली व निवडणूक आलेली संजय सिंह यांच्या नेतृत्वातील नवीन कार्यकारिणी दिनांक २४ डिसेंबरला निलंबित करण्यात आली.त्यामुळे आज कुस्तीपटूंच्या न्यायाच्या आशा उंचावल्या आहेत ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु सरकारने बृजभूषण शरण सिंह यांच्यावर खेळाडूंनी लावलेल्या आरोपांच्या संदर्भात कोणताही कठोर कारवाई केलेली नाही याचे दुःख आजही कुस्तीपटूंना व देशाला आहे.त्यामुळे कुस्तीपटुंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर ताबडतोब कारवाई व्हावी याकरिता पुरस्कार परत करण्याचा सिलसिला सुरूच आहे.सध्या बृजभूषण शरण सिंह याचे प्रकरण न्यायालयात आहे त्यामुळे संपूर्ण खेळाडूं आजही न्याय मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत.कुस्तीमहासंघाचा वाद आता सरकारच्या पाल्यात असुन न्याय प्रतिष्ठेत आहे. क्रिडामंत्रालयाने पॅरिस ऑलिम्पिकची पुर्वतयारी व्हावी या पार्श्वभूमीवर भारतीय कुस्तीची संपूर्ण सूत्रे हंगामी समितीकडे दिले.कारण राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन लवकरात लवकर व्हावेत. हे सरकारचे योग्य आणि निर्णायक पाऊल असल्याचे मी समजतो. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने भारतीय कुस्ती महासंघाचा कारभार पाहण्यासाठी नव्या तीन सदस्यीय हंगामी समितीची दिनांक २७ डिसेंबर २०२३ ला निवड केली.यामध्ये पूर्वीच्या समितीनचे अध्यक्ष भूपेंद्र सिंह बाजवा यांच्यासह माजी हॉकी कर्णधार मणीपंडे सोमय्या आणि नुकत्याच द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झालेल्या मंजूषा पावनगडकर-कन्वर असतील.यामुळे कुस्तीपटुंमध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण होवून देशातील खेळाडूंना प्रगतीपथावर अवश्य नेतील यात दुमत नाही.पॅरिस ऑलिम्पिक केवळ सात महिन्यावर आले आहे याचे गांभीर्य लक्षात घेऊन ताबडतोब संपूर्ण वाद मिटायला हवेत. कारण वेळ कमी आहे तयारी भरपूर करायची आहे यावर सरकारने व क्रीडा मंत्रालयाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.सरकार व क्रिडा मंत्रालय यांनी लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक खेळाडू हा मातीतून तयार होतो त्यामुळे त्यांचा सन्मान होने गरजेचे आहे. महिला खेळाडूंवर जर कोणी लैंगिक छळवणूक किंवा अत्याचार करीत असेल त्यावर न्यायप्रक्रियेच्या माध्यमातून लवकरात कठोर कारवाई व्हायलाच हवी. त्याचप्रमाणे देशातील कोणताही खेळाडू असो त्याला सरकार कडून, लोकप्रतिनिधींकडून, संघांच्या अध्यक्षांकडुन,खेळ समित्यांकडुन सन्मानजनक वागणूक मिळायलाच हवी यामुळे खेळाडूंची मान उंचावेल व खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन मनोबल वाढण्यास मोठी मदत होईल व यांचे चित्र पदक विजेत्यांच्या माध्यमातून देशाच्या संपूर्ण जनतेला दिसुन येईल.आज देशाचा प्रत्येक खेळाडू देशाची आन-बाण-शान आहे. कारण तो तिरंग्यासाठीच झुंज देत असतो.खेळाडू जेव्हा कोणतेही पदक जिंकतात तेव्हा मुख्यत्वे करून तिरंगा त्यांच्या हातात असतो व प्रत्येक खेळाडू तिरंग्याला सलाम करतो.

# भिडेवाड्यातील पहिली मुलींची शाळा



डॉ. प्रकाश खेत्री
मो. ७८४३०९२२४४

आधुनिक केसरी

**ज्ञानज्योतीसावित्रीमाई आणि महात्मा जोतिबा फुले यांनी १७५ वर्षांपूर्वी पुण्यामध्ये तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात हिंदुस्थानातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्यावेळी सावित्रीमाई केवळ १७ वर्षाच्या तर जोतिबा २१ वर्षाचे होते. पहिल्या दिवशी शाळेत केवळ ६ मुली आल्या. स्त्री शिक्षणाचे हे पहिले पाऊल, आधुनिक भारताचा पायाबनले, हीच शाळा खऱ्याअर्थाने स्त्री स्वातंत्र्या आणि मानवमुक्तीच्या युगाचा आरंभठरली आहे. आज सर्वच क्षेत्रात स्त्रीया स्वाभिमानाने जगत, गाजत आणि गर्जत आहेत.**

या शाळेचा परिणाम म्हणजे २०११च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात स्त्री साक्षरतचे प्रमाण ७५.८७% आहे तर देशात ६५.४६% आहे. स्त्री शिक्षणाचे महत्व आणि प्रमाण दिवसेनदिवस वाढत आहे. यामागे ज्ञानज्योती सावित्रीमाई - महात्मा फुले यांचे विचार, कार्य आणि कर्तृत्वाची प्रेरणा आहे. आज ही शाळा राष्ट्रीय स्मारक म्हणून (NATIONAL MONUMENT) उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.त्यामुळे फुले दाम्पत्याच्या जीवन कार्याचा इतिहास देशालाच नव्हे तर जगाला कळावा, याची काळजी शासन – प्रशासन यांच्याकडून घेतली जाणार आहे. या स्मारकाच्या उभारणीसाठी महाराष्ट्र शासन १०० कोटी रू. देणार असल्याची घोषणा नुकतीच केली आहे.)

ज्ञानज्योतीसावित्रीमाई- महात्मा जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक विचार, कार्य आणि कर्तुत्वामुळे पुण्याची ओळख "शिक्षणाचे माहेरघर" म्हणून सबंध देशभरात झाली आहे. पुणे प्रगत शहर, स्त्री, दलित आणि बहुजन चळवळीचे ऊर्जाकेंद्र बनले आहे.याचे प्रमुख कारण म्हणजे सावित्रीमाई - जोतिबांनी पुणे येथे स्त्रीमुक्तीचे आणि समग्र स्त्रीजातीच्या उद्धाराचे पहिले पाऊल टाकले. ते १ जानेवारी,१८४८ रोजी तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू करून. या नववर्ष आणि नवयुगाच्या साक्षीदार झाल्या.त्या सहा मुलीं १) अन्नपूर्णा जोशी, (वय ५ वर्षे) २) सुमती मोकाशी, (वय ४ वर्षे ) ३) दुर्गा देशमुख, (वय ६ वर्षे) ४) माधवी थत्ते, (वय ६ वर्षे ) ५) सोनू पवार, (वय ४ वर्षे)६) ज्योती करडिले, (वय ५ वर्षे ) या ४ ब्राह्मण, १ मराठा, १ धनगर अशा समाजाच्या मुली पहिल्या दिवशी शाळेत आल्या आणि याच सहाजणी खऱ्या अर्थाने युगांनुयुगाचा (अज्ञानाचा) अंधकार नष्ट करणाऱ्या (ज्ञानरूपी) क्रांतीज्योती साऊंच्या पणत्या बनल्या. स्वातंत्र्य आणि समतेच्या सहचारिणी झाल्या. आज या घटनेला १७५ वर्षे होत आहेत. मुली शाळेत पाठवाव्यात या करिता स्वतः सावित्रीमाई - जोतिबा पालकांच्या घरी जाऊन त्यांची मनधरणी करत. शिक्षणाचे महत्त्व सांगून शाळेत पाठवण्याचा आग्रह धरत. या दोघाच्या मदतीला वाडया-वस्तीवर जाऊन पालकांचे प्रबोधन करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे, रानबा महार, धुराजी चांभार,गणू मांग, फातिमा शेख, उस्मान शेख, तात्यासाहेब भिडे,सदाशिव गोवंडे, सखाराम भवाळकर, चिपळूणकर, जोशी,मस्के आदी बहुजन, दलित, अल्पसंख्यांक आणि उच्च वर्णीय मंडळीनी एकत्र येऊन सामुहिक प्रयत्न केले, तेही १७५ वर्षापूर्वी हे विशेष. म्हणजेच १७५ वर्षापूर्वी आधुनिक भारताची पायाभरणी खऱ्या अर्थाने या सर्व जाती धर्मातील मंडळीनी केली.

१८४८ ते १८५२ या केवळ चार वर्षात फुले दांपत्याने पुणे आणि पुण्याच्या परिसरात स्वखर्चाने १८ शाळा सुरू केल्या.तसेच 'नेटिव फॅमिली स्कूल ' आणि ' दि सोसायटी फॉर प्रमोटिंग द एज्युकेशन ऑफ महारस् ,मांग्जस् अँण्ड आदर्स ' या दोन शिक्षण संस्था काढल्या. फुल्यांचे अनेक सहकारी मुलींना पोत्यात ठेवत व खांद्यावर बसवून शाळेत आणत, समाजकंटकाना वा धर्ममार्तंडांना मुली दिसल्या तर ते मुलींच्या पालकांच्या घरी जात, मुलींना शाळेत पाठवून नये, जे पाठवत त्यांना आपण समाज आणि धर्मद्रोही काम करत आहात ही भिती दाखवत, पालकांना दम भरत, वाळीत टाकत, त्यांना शाळेपासून परावृत्त करत. सावित्रीमाई – जोतिबांच्या शैक्षणिक कार्याला समाजकंटक आणि धर्मांध लोकांचा कडवा विरोध होता. त्यांना हा भारतीय समाज अज्ञान व अंधश्रद्धेतचं हवा होता. ते त्याच्या दृष्टीने फायदेशीर होते. त्यामुळे ते शिक्षणक्रांती करणाऱ्या सावित्रीमाईंना शिव्या देत, तसेच आचकट- विचकट बोलत, वेळ प्रसंगी दगड मारत, अंगावर चिखल आणि शेण फेकत, तरी सावित्रीमाई तसूभरही डगमगल्या नाहीत.ध्येयापासून परावृत्त झाल्या नाहीत,शाळेत जातांना सावित्रीमाई दोन साड्या घेऊन जात. रस्त्याने जातांना खराब झालेली साडी बदलत आणि ज्ञानदानाचे काम करत. सावित्रीमाई आपल्या अंगावर दगड, चिखल आणि शेण फेकणाऱ्याला म्हणत , " मी माझ्या भगिनींना शिकवण्याचे पवित्र कार्य करीत असताना तुम्ही माझ्यावर शेण, अगर खडे फेकित आहात, ही मला फुलेचं वाटतात, ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो !" पुढे सावित्रीमाई-जोतिबांचा आदर्श घेत १८८२ पर्यंत ८४ शाळा पुण्यात सुरू झाल्या. आज केवळ पुणे शहरातच १५ विद्यापीठे कार्यरत आहेत, शेकडो शिक्षण संस्था आणि हजारो शाळा- महाविद्यालय लाखो मुलांना शिक्षण देत आहेत. तर देशभरात कोट्यावधी मुली शाळा- महाविद्यातून शिक्षण घेत आहेत, विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवित आहेत,स्त्रीया स्वाभिमानाने जगत, गाजत आणि गर्जत आहेत. तसेच राष्ट्र उभारणीचे काम



करत आहेत. याचे सर्वस्वी श्रेय सावित्रीमाई आणि महात्मा फुले यांच्या १ जानेवारी,१८४८ लासुरु केलेल्या या क्रांतीकारक शाळेला तसेच विचार आणि कार्यकर्तृत्वाला जाते.

आज फुले दांपत्याने सुरू केलेल्या भिडे यांच्या वाड्यातील पहिल्या मुलीच्या शाळेची अवस्था अत्यंत भग्न आणि मन विषन्न करणारी आहे. वाडा खिळखळा होऊन बेवारस अवस्थेमध्ये पडून आहे.कोणत्याही विचारी आणि विवेकी माणसाच्या मनात पुन्हः पुन्हा प्रश्न निर्माण होत असेल आपण एवढे कृतघ्न का झालो आहोत?जी शाळा स्त्री शिक्षण,राष्ट्रीय एकात्मता आणि आधुनिक भारताचा पाया ठरली आहे. त्या शाळा व वाड्याची अवस्था अशी दयनीय व्हावी, याचे सोयरे ना सुतक स्वतः आपल्याला, ना आपले कारभारी असणारे शासन-प्रशासनाला. पुण्यामधील लालमहाल, विश्रामबागवाडा आणि शनिवारवाडा या ऐतिहासिक स्थळांचा मोठा विकास झाला, तो आवश्यकच आहे. पण स्त्री स्वातंत्र्याची, उद्धाराचे आणि मानव मुक्तीचे प्रतीक ठरलेली शाळा आजही उपेक्षित हे कोणत्याही विचारी माणसाच्या मनाला पटणारे नाही. ही क्रांतीशाळा वा वाडा राष्ट्रीय स्मारक झाली पाहिजे, यासाठी सामाजिक क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते, संस्था व संघटनांनी मोर्चे काढले,चर्चा घडवल्या, बैठका आयोजित केल्या, फुले दाम्पत्य सन्मान रॅलीकाढल्या, उपोषणही केली, लोकजागर केला तोअनेक दशक. तेव्हा कुठे पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत २१ फेब्रुवारी,२००६ रोजी भिडेवाड्याचे स्मारक करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला,वाडा शासनाच्या ताब्यात घेण्यासाठी ५ जून, २००८ रोजी सुरुवात झाली. मात्र स्मारकाला विरोध असलेल्या दुकानदार, भाडेकरू आणि बँक हे ८ डिसेंबर,२०१० ला मुंबई उच्च न्यायालयात गेले आणि त्यावर१३ वर्ष न्यायालयामध्ये लढा सुरू राहिला. जवळपास ८० सुनावण्या झाल्या,महापालिकेने यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रक्रिया सुरू करून ३२७ चौरस मीटर जागेसाठी १ कोटी ३० लाख रुपये मोबदला देण्यासाठी ही रक्कम भूसंपादन विभागाकडे भरली होती. ही जागा पुणे मर्चंट को-ऑपरेटिव बँकेची असून तिथे २४ भाडेकरु होते. पुणे महापालिकेसह राज्य सरकारने भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू झाली हे पूराव्यानिशी मांडले आणि हा निकाल महापालिकेच्या बाजूने १६ ऑक्टोबर,२०२३ रोजी लागला असून पुण्यातील २५७ बुधवार पेठ येथील४ डिसेंबर,२०२३ रोजी रात्री ही ऐतिहासिक वास्तू महानगर पालिकेने आपल्या ताब्यात घेतली. त्यामुळे राष्ट्रीय स्मारक (NATIONAL MONUMENT) उभारण्याचा मार्ग मोकळा झाला.त्यामुळे फुले दाम्पत्याच्या जीवन कार्याचा इतिहास देशालाच नव्हे तर जगाला कळेल,असा विश्वास वाटतो.

भिडेवाडा स्मारकाच्या आराखड्यानुसार स्मारकाचा लूक हेरिटेज असणार. या स्मारकात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा पुतळा, वर्गखोलीत मुलींना शिकविताना सावित्रीमाई फुले, म्युझियम, ग्रथांलय, ५० ते ६० आसन व्यवस्थेचा बहुद्देशीय हॉल, माहिती दर्शक फलक आदी तीन मजली आणि आधुनेकतेची सांगड घालत, जुन्या रुपात शाळा उभारण्यात येणार असून छत हे कौलारू असतील. अशा पद्धतीने महापालिकेने हे प्राथमिक संकल्पचित्र तयार करून घेतले आहे. स्मारकाला सुमारे १०० कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. विशेष म्हणजे या स्मारकाच्या उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाने १०० कोटी रू. देणार असल्याची घोषणा नुकतीच केली आहे.आज १७५वर्षानंतर राष्ट्रीय स्मारक होण्याचा मार्ग मोकळा झाला असूनज्ञानज्योतीसावित्रीमाई फुले यांनी ज्या भिडे वाड्यात मुलींना शिकवले, ती शाळा / वाडाराष्ट्रीय स्मारक होणार आहे. ही बाब उशिरा का होईना आश्वासक व आनंददायी आहे. शासन -प्रशासन लवकरात लवकर हे स्मारक पूर्ण करेल अशी आशा आपण बाळगूया...!

# शिक्षणाचे महाद्वार! ते समाजसुधारणेचे प्रवेशद्वार!

आधुनिक केसरी

**जन्म ३ जानेवारी १८३१ ला पुण्यापासून जवळपास ५० किलोमीटरवर असलेले नायगाव या ठिकाणी झाला. पुणे-सातारा रस्त्यावर शिरवळपासून ५ किलोमीटरवर हे गाव वसलेलं आहे. सावित्रीबाई या खंडोजी नेवशे यांच्या ज्येष्ठ कन्या होत. १८४० साली वयाच्या १० व्या वर्षी त्यांचं जोतीरावांशी लग्न झालं. ११ एप्रिल १८२७ ला पुण्यात जन्मलेले जोतीराव त्यावेळी १३ वर्षांचे होते. १९ व्या शतकातील "स्त्रीचं" महत्व सांगताना संजीवनी देवी मराठे म्हणतात शिक्षक मी,सेवक मी, कलावंत मी, शास्त्रज्ञ मी, विश्वाची मी ममता, मजमधी संस्कृती वसे, संस्कृती जणु संवर्धे "स्त्री" माझं नावं. असं त्या सार्थ अभिमानाने सांगतात, स्त्रीचा धर्म शिकणे, आणि शिकवणे आहे.**

जिच्या हाती पाळण्याची दोरी! ती जगा उद्धारी!
असं स्त्रीच्या बाबतींत म्हंट्ल जात. म्हणजे स्त्री एक माता असते,गुरू असते. संस्काराचे कोठार असते, मायेचा सागर असते, भविष्याचां शिल्पकार असते. म्हणजे स्त्रीचं आपल्या देशाचं भवितव्य घडवु शकते, अशा पद्धतीची माया असणारी विद्येचे महाद्वार, आद्य शिक्षिका स्त्री उद्घारक आदर्श व्यक्तीमत्व, शिक्षणाची ज्योत, तेवत ठेवणारी माऊली, सावित्रीबाईं फुले . यांचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील मुख्य इमारती समोरचा पूर्णाकृती पुतळा,आजही या ऐतहासिक क्षणाची आठवण म्हणून उभा राहिलेला दिसतो. महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुण्यात मुलीची पहिली शाळा १८४८ साली सुरू केली, या शाळेत मुलींना शिकवण्यासाठी सावित्रीबाईंनी मोलाचे काम केलें, इतकचं नाही तर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यां समता, समानता, जोपासणाऱ्या एक महान समाजसुधारनेचे प्रतीक ठरतात. ज्ञानज्योती सावित्रीबाई १८४८ ते १८९७ अशी सलग ५० वर्षे लोकांसाठी राबत होत्या. सेवा आणि करुणेचा एक अनोखा आदर्श त्यांनी घालून दिला. बालहत्त्या प्रतिबंधक गृह, सत्यशोधक विवाह, दुष्काळात १००० गरिब मुलांचे संगोपन करणे आणि ब्राह्मण विधवांच्या केशवपनाविरुद्ध नाव्ह्यांचा संप घडवणे. या ४ कामांत सावित्रीने आपले नेतृत्व केले.सावित्रीबाईंचं ऐतिहासिक योगदान यातून अधोरेखित होतं.

राजकीय ऋषी नारायण महादेव उर्फ मामा परमानंद यांनी सयाजीराव गायकवाडांना लिहिलेल्या पत्रात सावित्रीबाईंबद्दल म्हटले आहे की, 'जोतिरावांपेक्षा त्यांच्या पत्नीचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. तिची योग्यता काय सांगावी? आपल्या पतीबरोबर तिने संपूर्ण सहकार्य केले आणि त्यांच्याबरोबर राहून वाट्यास येतील. त्या हालअपेष्टा भोगल्या. उच्चवर्णीयांतील उच्चशिक्षण घेतलेल्या स्त्रियांतही अशा प्रकारची त्यागी स्त्री आढळून येणे कठीण आहे. त्या उभयतांनी लोककार्यार्थ आपले सारे जीवन खर्च केले.

शिक्षण, स्त्रीपुरूष समता, सामाजिक न्याय या विषयांची "सावित्री- जोती" यांनी लिहिलेली 'विषयपत्रिका' आजही मार्गदर्शक आहे. त्यांचं समग्र क्रांतिकारी चिंतन आजही प्रस्तुत असल्याचं दिसून येतं. त्यामुळेच त्यांच्या जीवनकार्य आणि विचारांबद्दल समाजाच्या सर्व स्थरात विशेष रस वाटू लागला. आज जो त्यांचा अभ्यास चालू आहे, त्यामागे हे समाजशास्त्रीय वास्तव दडलेल आपल्याला दिसुन येत.

मुंबईच्या कु. शांताबाई रघुनाथ बनकर यांची १९३९ मधे प्रकाशित झालेली 'सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र' ही पुस्तिका आणि त्यानंतर १९६६ साली सौ. फुलवंताबाई झोडगे यांनी लिहिलेलं 'क्रांतिदेवता सावित्रीबाई फुले' हे चरित्र महत्त्वाचं आहे. 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' हा चरित्रग्रंथ १९८० साली लिहिला. डॉ. कृ. पं. देशपांडे यांनी सावित्रीबाईंच्या जीवन आणि साहित्यावर 'अग्निफुले' हा ग्रंथ १९८२ साली प्रकाशित केला. नंतरचे सगळे ग्रंथ याच माहितीवर आधारित प्रकाशित झालेले दिसून येतात.

लग्नानंतर ज्योतीरावांनी सावित्रीबाईंना घरीच शिक्षण दिल्याचं शासकीय कागदपत्रांवरून दिसून येतं. १ मे १८५१ ते ३० एप्रिल १८५२ च्या शैक्षणिक अहवालात म्हटल्याप्रमाणे, ज्योतीरावांनी स्वतःच्या पत्नीला घरी शिक्षण देऊन शिक्षिका बनवले.' २२ नोव्हेंबर, १९५१ च्या 'बॉम्बे गार्डियन' वृत्तपत्रातल्या बातमीवरून सावित्रीबाईंच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी जोतीरावांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर (जोशी) यांनी घेतल्याचं दिसतं. सावित्रीबाईंनी अहमदनगर इथे मिस फॅरार बाईंच्या आणि पुण्यात मिचेलबाईंच्या नॉर्मल स्कूलमधे अध्यापनाचं प्रशिक्षणही घेतलं. त्यामुळे सावित्रीबाई यांचं नाव आद्य भारतीय शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत, हे तत्कालीन दस्तऐवजांवरून स्पष्ट होतं. हीच देशाची खरी ज्ञानज्योती असल्याचं स्पष्ट दिसत.

सावित्रीबाईंनी शिकवण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेलं पहिलं पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरवात होय. समाजाकडून होणारा कडवा विरोध सहन करीत आणि शिव्याशाप शांतपणे ऐकत सावित्रीबाई काम करत होत्या. त्या शाळेत जाता येताना सनातनी गुंड, मुद्दाम रस्त्यावर थांबत. अचकट-विचकट बोलत. कधीकधी दगड मारीत. अंगावर चिखल किंवा शेण टाकीत असत.

शाळेत जाताना सावित्रीबाईंना सोबत २ साड्या घेऊन जाव्या लागत असत. रस्त्याने जाताना खराब झालेली साडी शाळेत गेल्याबरोबर बदलावी लागे. दुसरी परतताना खराब होई आणि तरीही सावित्रीबाई आपल्या कामात खंड पडू देत नव्हत्या.

ब्राम्हण विधवांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह

१८६३ मध्ये ज्योतीराव सावित्रीबाईंनी विधवांसाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केलं. म्हणजे, एक तर हे गृह फक्त 'ब्राह्मण विधवांसाठीच' सुरू करण्यात आलेलं होतं आणि त्यात



सावित्रीबाईंचा पुढाकार होता. ४ डिसेंबर १८८४ ला जोतीरावांनी मुंबई सरकारच्या अप्पर सचिवाला लिहिलेल्या पत्रात याबाबतची सगळी माहिती नोंदवलेली आपल्याला दिसुन येते.जोतीराव सावित्रीबाईंनी स्वतःच्या घरात एक वसतिगृह चालवलं. दूरदूरहून मुलं शिक्षणासाठी तिथे येत असत. लक्ष्मण कराडी जाया या. मुंबईच्या विद्यार्थ्याने या वसतिगृहात राहून सावित्रीबाईंच्या मायेची पाखरण अनुभवली होती. त्याने आठवणीत असे म्हटले होते की, 'सावित्रीबाईंसारखी दयाळू व प्रेमळ अंतःकरणाची स्त्री मी अजूनसुद्धा कोठे पाहिली नाही. त्या आम्हा मुलांवर आईपेक्षासुद्धा जास्त प्रेम करीत असत.'

दुसऱ्या एका मुलाने आपल्या आठवणींमधे सावित्रीबाईंचा स्वभाव, त्यांची साधी राहणी आणि ज्योतीराव सावित्रीबाईंचे परस्परांवरील अपार प्रेम यांची विलक्षण नोंद यामध्ये केलेलीं दिसुन येते.

महादू सहादू वाघोले लिहितो, 'सावित्रीबाई फारच उदार होती. तिचे अंतःकरण दयेने भरलेले होते. गोरगरिबांवर ती फार दया करी. ती अन्नदान पण फार करी. ती कोणासही जेऊ घाली. गरीब बायांची अंगावरची फाटलेली लुगडी पाहून त्यांना ती आपल्या घरातील लुगडी देई.

सावित्रीबाईंना स्त्रीजातीच्या उन्नतीची फार कळकळ असे. . त्यांची मुद्रा नेहमी शांत असे.. ती नेहमीच हसतमुख असे. मात्र, तिचं हसू गालांवर तेवढं दिसून येईल. इतकेच ते मर्यादित असे. सावित्रीबाईंनी

शिक्षिकेचे काम केलेलं पाहून पुण्यातील सुशिक्षित असणाऱ्या महिला, पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी आणि रमाबाई रानडे त्यांच्या भेटीस येत असत.

१८९३ मध्ये सासवड येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेचे अध्यक्षस्थान सावित्रीबाईंनी भूषवलं. १८९६ च्या दुष्काळात सावित्रीबाई खूप राबल्या. १८९७ साल उजाडलं तेच प्लेगचं थैमान घेऊन. पुणे परिसरात दररोज शेकडो माणसं मरू लागली. सरकारने रँड या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली प्लेगचा बंदोबस्त करण्याचं काम हाती घेतलं.सावित्रीबाईंनी डॉ. यशवंतला रजा काढून बोलावून घेतलं आणि हडपसर-महंमदवाडीला ससाण्यांच्या माळरानावर त्यांनी डॉ. यशवंतला दवाखाना घालायला लावला. त्या स्वतः आजारी माणसांना उचलून दवाखान्यात आणीत, त्यांच्यावर उपचार करीत. हा रोग संसर्गजन्य आहे. हे माहीत असूनही त्या रुग्णांची सेवाशुश्रूषा करीत .

सावित्रीबाईंना प्लेगची लागण झाली.१० मार्च १८९७ ला सुमारास त्यांचं प्लेगमुळे निधन झालं. अशी स्त्री शिक्षणाची ज्योत अखंड तेवत ठेऊन त्यांनी समाजासाठी अहोरात्र कार्य केले. आजच्या स्त्रिला लाजवेल अशी समाजसेविका या महाराष्ट्रात पुन्हा होणे नाही. शासनाने नुकतेच सावित्रीबाईं फुले यांनी चालू केलेल्या शाळेची जागा म्हणजे आज पुणे येथे स्थित असलेला "भिडे" वाड्याला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिलेला दिसून येतो तेच ऐतेहासिक उदाहरण आपल्याला इतिहासाकडे घेऊन जातं. असे कार्य सावित्रीबाईंनी केलेलें दिसुन येते. अशी क्रांतीज्योती इतिहासात अखंड तेवत राहावी.

प्रा. बालाजी हरीभाऊ मगर
मो. ९३२२९८८७९३
बाबुरावजी घोलप कॉलेज
सांगवी पुणे.

# नूतन वर्ष, विश्व धूम्रपानविरोधी दिन



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**तंबाखूचे खैनी, चैनी, गट्टू, गुटका, गुडाकू, जर्दा, तईबूर, स्नफ इत्यादीच्या रूपात सेवन होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाण्याने इतरांना फारसा त्रास होत नाही. मात्र, सिगारेट, विडी, सिगार, पाईप्स, हुक्का, चिलीम, हुकलीस, चुट्टा, चिरुट इत्यादीने परिसरातील इतर व्यक्तींना त्रास होतो. शरीरात धुराने प्रवेश केल्याने न ओढणारेही अप्रत्यक्षपणे धूम्रपानाचे बळी ठरतात. यामुळेच नववर्षाच्या आरंभी धुम्रपानास विरोध हा झालाच पाहिजे. म.फुले दांपत्यांनी दिलेले शिक्षण सुसंस्कारमय होते, हे त्यातून दिसेल आणि हाच त्यांचा मोठा सन्मान ठरेल.**

संपूर्ण जगावर इंग्रजीचे सर्वाधिक प्राबल्य आहे. त्यामुळे साहजिकच १ जानेवारी हा दिवस नववर्षारंभ म्हणून धुमधडाक्यात त्याचे स्वागत होत आहे. महाराष्ट्रात म.फुले सन्मान दिन साजरा करण्यात येतो. कारण याच दिवशी कामगार बंधूंनी त्यांना महात्मा ही पदवी देऊन गौरविले होते. म्हणून तो दिवस उजाडण्याची अनेक दिवसांपासून प्रतिक्षा केली जाते. त्याबरोबरच याच नुतनवर्ष आरंभदिनी पार्टी करून नव्या वर्षाच्या तोंडावर पान खाऊन कसे थुंकता येईल? याचे मनसुबे रचले जातात. तशी मनोमन अपेक्षा बाळगली जाते. त्यामुळे वर्षारंभ लक्षात घेऊन जागतिक धुम्रपानविरोधी दिन पाळण्यात यावा, असेही ठरविले गेले. मात्र याकडे कानाडोळा केला जातो. संकल्प तर भरमसाठ आणि अशक्यप्राय केले जातात. डोंगर, चंद्र, मंगळ, समुद्र, आकाशात बंगला बांधेन, अमुक धरेन, तमुक सोडेन. मात्र धुम्रपान विरोधावर ब्र शब्दही उच्चारणार नाही. म.फुले दांपत्याने बहुजनांसाठी याच दिवशी शाळा उघडली. म्हणून महाराष्ट्रात हाच दिवस म.फुले दांपत्य सन्मानदिन साजरा केला जातो. एकीकडे सुशिक्षितांची संख्या वाढली. त्याच्या समप्रमाणात वाईट व्यसनांधांची संख्याही फोफावली. हेच धुम्रपान- व्यसनांचे व्यस्तप्रमाण असावयास हवे होते. शिक्षणामुळे मती प्रकाशली, गुलामगिरी उधळून लावली व नवे-जुने कळू लागले. पण व्यसने-धुम्रपानाचे प्रमाण का वळू शकत नाही? स्वतःसह प्रियजनांच्या व इतरांच्याही आरोग्याचे वाभाडे निघाले. कसे का? याचे आत्मपरीक्षण व आत्मचिंतन होणे अत्यंत गरजेचे आहे.

सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना, कामाच्या ठिकाणी आणि घरातील सदस्यांजवळ धूम्रपान केल्यास त्याच्यातील विषारी रासायनिक घटकांमुळे कर्करोग होण्याचा संभव अधिक असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष तंबाखू सेवनामुळे हृदय विकार, फुफ्फुसाचा कर्करोग, गुंतागुंतीचे फुफ्फुसाचे आजार, क्षयरोग, स्ट्रोक, श्वसन संस्थांचे आजार होतात. यापैकी ४० टक्के आजार हे धूम्रपानाशी संबंधित आहेत. महिलांच्या धूम्रपानामुळे वेगवेगळी गुंतागुंत निर्माण होते. गर्भधारणेशी संबंधित गुंतागूंत, अपुऱ्या दिवसांची प्रसूती, कमी वजनाच्या बाळाचा जन्म इत्यादी. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम माहिती असतानाही आजही भारतात २४.३ टक्के भारतीय पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. केरळमधील काही गावांमध्ये




ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत लहान मुलांद्वारे तंबाखू देऊन केले जाते. भारतातील काही विशिष्ट भागातील कुटुंबातील लग्न समारंभात पाहुण्यांना तंबाखू देऊन सन्मान करण्याची प्रथा आहे. मिझोरमच्या ग्रामीण भागात स्वागत करण्याची ताइबूर ही प्रथा तंबाखू देऊनच साजरी केली जाते.

तंबाखू सेवनाने तोंडाचा कर्करोग होण्याच्या दाट शक्यतेसह इतर आजारही बळावत आहेत. याबाबत जनजागृती होत असतानाही देशात २४.३ टक्के पुरुष आणि २.९ टक्के महिला तंबाखूचे सेवन करीत आहेत. दरवर्षी १ जानेवारी हा जागतिक धूम्रपान विरोधी दिन म्हणून पाळला जातो. तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम दिसत असतानाही गेल्या कित्येक वर्षांपासून भारतीय माणसाच्या जगण्याशी आणि संस्कृतीशी जुळलेल्या तंबाखूला प्रतिबंध करणे शक्य झालेले नाही. तरुणांमध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढत असल्याचे आाढळून आले आहे. तंबाखूमध्ये जवळपास चार हजार रसायने आढळतात. त्यात कमीत कमी २०० विषारी घटक आहेत. जे निकोटीन, कार्बन मोनोक्साईड, टार, अर्सेनिक, फॉर्मल्डिहाईड इत्यादींचा विषारी घटकांमध्ये समावेश होतो. तंबाखू खाण्यास वा धुम्रपानाची सवय जडण्यास कुटुंबातील वडीलधारी व्यक्तींचादेखील परिणाम होतो. याशिवाय समवयस्कांचा प्रभाव, प्रयोग करून पाहणे, मतांचा प्रभाव, उत्सुकता, फिल्मी कलाकारांचे अवलोकन व नक्कल, चित्रपटातील मॉडेल्स, जाहिरातींचा प्रभाव, स्वतःचे मन शांत करण्यास, जल्लोस व आनंदोत्सव साजरा करण्यास, जागरुक राहण्यास, ताजेतवाने वाटण्यास, धाडस वाढवण्यास, कामाची क्षमता वाढवण्यास, विरंगुळा, टाइमपास आणि मानसिक आरोग्यासाठी तसेच निष्काळजी प्रवृत्ती असल्यास तंबाखूचे सेवन किंवा धुम्रपान केले जाते.

भारतात १० पैकी सात स्मोकर्सना धूम्रपान धोकादायक आहे, याची जाणीव असते. ५३ टक्के लोक धूम्रपान सोडण्यास असमर्थ आहेत, अशी फाऊंडेशन फॉर अ स्मोक-फ्री वर्ल्डने प्रसारित केलेल्या माहितीतून हे सत्य उघड झाले आहे. भारतात दर दिवशी १०४ दशलक्षाहून अधिक लोक तंबाखू सेवनामुळे आपल्या आरोग्याशी खेळत असतात. देशात रस्त्यारस्त्यांवर हाताने वळलेल्या विड्या क्षुल्लक किमतीत उपलब्ध असतात. या प्रकारामुळे भारतात मोठ्या प्रमाणात तंबाखू सेवन चालते. हा पारंपरिक सिगरेट प्रकार भरपूर लोकप्रिय असून त्यांच्यावर कराचा भार नाही. त्यामुळे भारतासारख्या देशात इतर देशांच्या तुलनेत तंबाखू नियंत्रणाचे निराळे पर्याय राबवून तंबाखू विरामाला चालना देऊन धोके कमी केले पाहिजेत. आपण म.फुले दांपत्य सन्मान दिनाचे स्मरण ठेवून नववर्षारंभी विश्व धुम्रपान विरोध केले, तर मोठ्या कौतुकास पात्र ठरू शकतो.

!! सर्वांत सुमती निर्माण होणेस्तव नववर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# कविता : विशीतल्या आणि मिशीतल्या

आधुनिक केसरी

**प्रा. मधुकर जाधव यांच्या 'संस्कृती : काल आणि आज' या ललित लेखसंग्रहानंतर 'कविता : विशीतल्या आणि मिशीतल्या' या काव्यातून त्यांनी युवकांच्या पोटातले शब्द ओठावर आणल्याचे दिसून येते. खवळलेल्या समुद्राला भरती यावी त्याप्रमाणे युवकांच्या तारुण्यावस्थेत जो भावनांचा कल्लोळ निर्माण होतो, अशा मानवी मनाचे व त्यानंतर प्रौढ अवस्थेत होणारे बदल कवीने सहजतेने शब्दबद्ध केलेले आहेत. पॅरिस प्रकाशन, पुणे द्वारा प्रकाशित या संग्रहाला सुप्रसिद्ध वक्ते व साहित्यिक डॉ. भगवान खरात यांची प्रस्तावना लाभली असून साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी श्रीकांत देशमुख यांची पाठराखण मिळाली आहे.**

कवीने कविता 'विशीतल्या' व कविता 'मिशीतल्या' या शीर्षकाप्रमाणेच स्वतंत्र विभाग करून मानवी जीवनाची विभागणी याद्वारे केलेली दिसून येते. पहिल्या भागात वीस कविता असून स्वप्नमय जगाचं चित्रण आहे, तर उत्तरार्धातील कवितांमधून आतील चिरंतन मानवी मूल्यांची साक्ष येते. मानवी जीवन हे फक्त स्वप्नमय नाही तर या स्वप्नांनाही विचारांची धार आणि मूल्यांचा आधार असावा लागतो. त्या जीवनाला पूर्णत्व प्राप्त होते. हा कवीचा विचार आजच्या पिढीला प्रेरक, उद्‌बोधक, आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारा व दिशादर्शक आहे. म्हणून ही कविता आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातही एकाच वेळी स्वप्न आणि वास्तवाचे भान व जाण निर्माण करणारी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कवीने सुरुवातीलाच "विशीतले वय, या वयातील विचार हे फार गांभीर्याने घेता येण्यासारखे विषय नसले, तरी अगदीच कानाडोळा करण्यासारखे सुद्धा नसतात. या वयातील अर्धवट शहाणपणा जो शहाणपणाकडील वाटचाल ठरू शकतो, आक्रमकपणा जो ठोस भूमिका घेण्याची क्षमता विकसित करू शकतो, असे बदलही विशीतून मिशीत जाणारांमध्ये घडू शकतात, मात्र त्यावर ज्येष्ठांची करडी नजर हवी." असे मत नोंदवता मन, समाज, समाजसुधारक, देश याबाबतीत निरीक्षणाच्या आधारे माझे जसे मत बनत गेले, तसे मी मिशीतल्या कविता या भागामध्ये शब्दबद्ध केले आहे, असे स्पष्ट केले आहे. यावरून कवीचा प्रांजळपणा आणि भविष्यातील उजळपणा दिसून येतो. संग्रहाच्या 'कविता विशीतल्या' या भागामध्ये स्वप्न, एक गोरी, रुपवती, तुझ्या वेणीचा गजरा, पुष्पीनं एकदा, प्रियतमा, पाणावलेल्या डोळ्यांमध्ये, मन तुझ्यावर, चंद्र होता साक्षीला, मीही केलं होतं प्रेम, जीव ओतून, आता नाही बोलणार, आलो असतो, प्रेमळ आजी, दादा कोंडके, माझा भारत महान, वारे निवडणुकांचे, अरे शेतकऱ्या, झाल्या निवडणुका आणि मी नाही विसरलो अशा रचना असल्या तरी या पैकी खऱ्या युवावस्थेतील गुलाबी जीवनाचे चित्रण पहिल्या तेराच कवितांतून घडते. एक गोरी मधून ग्रामीण भागातील महाविद्यालयात बसने प्रवास करणाऱ्या युवतीचे वर्णन करताना कवी म्हणतो की, "कुठून आली चालली कोठे, झेपेल का दुनियेला हे सौंदर्य मोठे, बसमधून उतरताना, घोळे मनी एकच विचार, एक गोरी..." सौंदर्याविषयी केलेले वर्णन येथे लक्षात येते. ग्रामीण प्रेमाची अस्सल भाषा कशी असते, ती 'पुष्पीनं एकदा' या कवितेत खालील प्रमाणे दिसून येते. "पुष्पीनं एकदा मह्याकडं पाह्यलं, पाहून तोंड कसंसच केलं, म्या म्हणलं काय असं घडलं, काहून ब्वा तोंड तिनं तसं केलं, पुष्पीनं एकदा..." कवीची प्रेमळ भावना, प्रेयसीकडे पाहिल्यावर आलेले अनुभव व पडलेला प्रश्न कवीने मांडला आहे. आपल्या अभिसारिकेसोबत प्रेमाच्या आणाभाका कशा दिल्या घेतल्या जातात याची साक्ष... "तुझी सोबत असेल तर सात जन्माची माझी साथ आहे, तुझ्या हाती देण्यासाठी तत्पर माझा हात आहे." याद्वारे येते. यामध्ये प्रेयसी आपल्याला साथ द्यायला तयार असेल तर आपण काहीही करू अशी मनीषा कवीने व्यक्त केली आहे. कवीने युवा अवस्थेतील भावतरंगमांडताना....

**"मन तुझ्यावर जडलं होतं,**
**प्रेम तुझ्याशीच केलं होतं,**
**माहित होतं हे मला जरी,**
**कित्येकांना तू ठोकरलं होतं"** असे काही गोड कटू अनुभव गुंफले आहेत. प्रेमात जी 'रिस्क' असते ती आपण पत्करली असे तर कवीला सांगायचे नसावे. हे सर्व क्षणभंगुर, आंधळे असते याची




जाणीव कवीला असल्याचे जाणवते. त्याचे वर्णन मीही केलं होतं प्रेम या कवितेतील ओळीमध्ये...

**"म्हणतात ना सावली सुद्धा,**
**अंधारात साथ सोडते,**
**तिनेही हे तत्व का पाळावे,**
**जपतो याच विचारावर"**

वरील प्रमाणे येते. शेवटी प्रेयसी कशी दगा फटका करते. ते आता नाही बोलणार मध्ये

**"आता नाही बोलणार तुझ्यासवे,**
**भेटणार नाही कधीच तुला,**
**खेळलीस का तू माझ्या भावनांशी?,**
**का दिलास तू दगा मला?..."**

यामधील अंतर्मनाचा भाव आपणास वास्तव अनुभव कथन सांगून जातो. आपल्या जीवनातील दारिद्रय, पोटाचा प्रश्न प्रेमापेक्षा कसा वेगळा आहे याची समज कवीला येते आणि म्हणून तो या स्वप्नमय जगातून बाजूला सरतो..

**"आलो असतो तरीही,**
**तुझ्यासवे चित्रपट बघायला,**
**पण त्या निर्मात्याने त्यात,**
**माझेच दुःख चितारले आहे...."**

कर्तव्य, जबाबदारी याला महत्त्व देऊन कवी स्वतःभोवती आवळलेला फास सेल करू पाहतो, असे वाटते.

कवी आपला आदर्शवाद ठरवून वास्तव जीवनाची वाटचाल करू लागतो, याचे चित्रण प्रेमळ आजी, दादा कोंडके, माझा भारत महान, वारे निवडणुकांचे, अरे शेतकऱ्या, झाल्या निवडणुका, मी नाही विसरलो यासारख्या कवितांमधून येते. जसे की...

**"मी नाही विसरलो मला,**
**अजून काय करायचे आहे,**
**माझ्यासाठी झुरणाऱ्या आईबाबांचे,**
**स्वप्न पूर्ण करायचे आहे..."**

यामधून त्याच्या मनगटातली उर्मी आणि मनातील काहीतरी करण्याची जिद्द जागृत झालेली दिसून येते.

'कविता मिशीतल्या' या दुसऱ्या भागामध्ये युवावस्थेतील भरकटणाऱ्या मनाला भानावर आणणाऱ्या, आत्मभान जागृत करणाऱ्या, आई-वडील, थोर महापुरुष, समाजसुधारक यांचा आदर्श अंगी बाळगणाऱ्या, सामर्थ्याचे बळ, संस्काराचे वळ आणि समाजातील तळ शोधणाऱ्या कविता आहेत. जसे की...

**"जग असो कसंही,**
**आपण चांगलं वागावं,**
**स्वतःसाठी जगता जगता**
**इतरांसाठी झटावं..."**

मधुकर जाधव यांच्या कवितेचे आणखी विशेष म्हणजे मराठवाडी-वैदर्भी बोलीभाषेचा अनोखा संगम. शेती मातीशी नाळ जोडणारी अस्सल ग्रामीण शब्दरचना. अल्प अक्षरत्व आणि बहूअर्थत्व, विविध छंदोमय रचना, यामुळे ती कधी वाचकांच्या हृदयालाभिडते तर कधी वाचकांचे काळीज फाडते. म्हणून ती सुप्त मनाचा आणि 'प्रेम'ळ जीवनाचा आविष्कार वाटते. मधुकर जाधव यांच्या 'कविता : विशीतल्या आणि मिशीतल्या' या कवितासंग्रहाचे वाचक नक्कीच स्वागत करतील असा विश्वास आहे.

**डॉ. चत्रभुज बाळासाहेब कदम**
जि. अमरावती, मोबा. ९४२१३४४०१३

# ध्येय साध्य झाले नाही पण नावाला दिगंत कीर्ती लाभली

आधुनिक केसरी

**प्रेमात आकंठ बुडालेला माणूस आकाशातील तारे तोडून आणण्याची स्वप्नेही पाहात असतो. असाच एक युवक आपल्या शेजारी राहणाऱ्या मुलीवरील आपले प्रेम व्यक्त करण्यासाठी तिच्या घरी गेला. ती त्याला म्हणाली, तुझे माझ्यावर खरोखरच प्रेम असेल तर तू स्वत: कोणीतरी बनून दाखव किंवा नावारूपाला येऊन दाखव म्हणजे माझी खात्री पटेल की तू खरोखरच माझ्यावर प्रेम करतोस याची ! त्या मुलीचे ते शब्द त्या युवकाच्या काळजात अक्षरश: रुतून बसले आणि जीवनात काहीतरी बनण्यासाठी त्याने ताबडतोब मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला.**

१५ एप्रिल, १९२२ या दिवशी राजस्थान राज्यातील जयपूर शहरात जन्माला आलेला इक्बाल हुसेन नावाचा तो युवक म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून भविष्यकाळात हिंदी चित्रपटसृष्टीच्या गीतालेखनाच्या क्षेत्रावर अधिराज्य गाजविणारे विख्यात गीतकार हसरत जयपुरी हे होत. हसरत यांचे वडील भारतीय पायदळात नोकरी करीत होते आणि त्यांच्या मातोश्रींना मात्र ते पसंत नव्हते. कवी असलेले हसरत यांचे आजोबा फिदा हुसेन फिदा यांच्याकडून हसरत यांनी उर्दू आणि फारसी भाषांचे धडे घेतले. हसरत त्यांच्या शेजारी राहणाऱ्या राधा नामक युवतीवर एकतर्फी प्रेम करीत होते. राधा तिच्या घराच्या पडवीत उन्हात उभी राहून आपले केस विंचरत होती. हसरत तिला त्यांच्या घराच्या गच्चीवरून न्याहाळत बसले होते. आणि त्यांना एक गीत सुचले. "ये मेरा प्रेम पत्र पढ कर...." पण ते गीत ते राधापर्यंत कधी पोहोचवूच शकले नाहीत ! भलेही ते गीत त्यावेळी राधापर्यंत पोहोचले नसेल पण बऱ्याच कालावधीनंतर अभिनेते-निर्माते-दिग्दर्शक राज कपूर यांनी १९६४ साली आपल्या `संगम' या चित्रपटात ते समाविष्ट करून समस्त प्रेमीजनांचे आवडते गीत करून टाकले. कोणीतरी बनून दाखव हे राधाचे शब्द हसरत यांच्या कानात घुमत होते आणि आपण खरोखरच तिला तसे करून दाखविले पाहिजे असे मनाशी पक्के ठरवून हसरत जयपुरी जयपूरहून मुंबईला आले आणि महिना ११ रुपये पगारावर `बीइएसटी'मध्ये (बेस्ट) बसवाहकाची (कंडक्टर) नोकरी करू लागले. पण गंमत अशी, की हसरत त्यांच्या बसमधे बसणाऱ्या सुंदर स्त्रियांना विनामूल्य प्रवास करू देत असत. मात्र यामुळे ते अडचणीत आले आणि त्यांना ती नोकरी गमवावी लागली. ८ वर्षे केलेल्या त्या नोकरीनंतर ते ऑपेरा हाऊस परिसरात पदपथावर मातीची खेळणी विकू लागले. मुंबई सेंट्रल भागात भारवाहकाचे काम करणारा एक मजूरही हसरत जयपुरी ज्या ठिकाणी विक्रीला बसत असत त्या जागेजवळ रात्री पदपथावरच झोपत असे.

एके दिवशी सकाळी हसरत झोपेतून जागे झाले तेव्हा त्यांच्या जवळच झोपणारा तो मजूर निपचित पडला असल्याचे त्यांना आढळून आले. त्याचा श्वास थांबला आहे हे हसरत यांच्या लक्षात आले. ते त्याच्या अंत्यसंस्कारांच्या तयारीला लागले. पण त्या गरीब माणसाच्या पार्थिवाला खांदा देण्यासाठी हसरत यांच्याशिवाय अन्य कोणीही नव्हते. दुसऱ्यांचे ओझे त्यांच्या इच्छित स्थळी व्यवस्थित पोहोचविणाऱ्या या गरीब मजुराच्या कलेवराला स्मशानापर्यंत पोहोचविणाराही कोणी नसावा या जाणिवेने हसरत यांचे मन गलबलून गेले. त्यांना अतीव दुःख झाले आणि त्या विमनस्क मनस्थितीतच त्यांनी `मजदूर की लाश' या शीर्षकाचे गीत लिहिले. काही काळानंतर एका मुशायऱ्यात हे गीत हसरत यांनी वाचून दाखविले. त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते सुप्रसिद्ध अभिनेते पृथ्वीराज कपूर ! त्यांनी ते गीत ऐकले आणि हसरत यांना आपले पुत्र राज कपूर यांना भेटण्यास सांगितले. राज कपूर त्यावेळी `बरसात' हा चित्रपट निर्माण करीत होते. त्या चित्रपटाला शंकर-जयकिशन ही संगीतकारांची नवी जोडी संगीत देत होती. राज कपूर यांच्या सांगण्यावरून शंकर-जयकिशन यांनी हसरत यांना एक चाल ऐकविली आणि विचारले, की आपण या चालीवर काही लिहू शकाल ? हसरत यांनी ती चाल ऐकल्यावर काही मिनिटांतच "जिया बेकरार है...." हे गीत लिहून त्यांच्या हाती सुपूर्द केले. ते गीत लता मंगेशकर यांनी गायले आणि ते अतिशय लोकप्रिय ठरले. त्यानंतर हसरत यांनी "छोड गए बालम मुझे हाय



अकेला छोड गए" हे दुसरे गीत लिहिले. त्याला जयकिशन यांनी चाल लावली आणि ते द्वंद्वगीत मुकेश व लता मंगेशकर यांनी गायले. त्यानंतर मात्र हसरत जयपुरी यांनी पुन्हा मागे वळून पाहिले नाही. पाहता पाहता शंकर-जयकिशन या संगीतकारद्वयीचे हसरत जयपुरी हे एक अविभाज्य अंग बनले. दुसरे अविभाज्य अंग म्हणजे अव्वल गीतकार शैलेंद्र ! या अफलातून चौकोनाने हिंदी चित्रपटसृष्टीच्या संगीताचे क्षेत्र पादाक्रांत करण्यास प्रारंभ केला. त्यात त्यांच्या यशाची चढती कमान दिसू लागली. त्यामुळे शंकर-जयकिशन जोडीने गीतकारांची ही अप्रतिम जोडी `वाटून' घेतली. हसरत यांच्या गीतांना जयकिशन चाली लावू लागले तर शंकर आणि शैलेंद्र ही दुसरी दर्जेदार जोडी बनली. हसरत आणि शैलेन्द्र यांची अनेक गीते कमालीची लोकप्रिय ठरली. आजही ती लोकप्रिय आहेत इतका त्यांचा दर्जा उच्च होता. जुबिली कुमार ठरलेले अभिनेते राजेंद्र कुमार आणि दाक्षिणात्य अभिनेत्री बी. सरोजादेवी हे नायक-नायिका असलेला दाक्षिणात्य निर्मात्यांचा `ससुराल' हा चित्रपट १९६१ साली प्रदर्शित झाला. त्यातील "तेरी प्यारी प्यारी सूरत को किसी की नजर न लगे" हे मोहम्मद रफी यांनी गायलेले गीत त्याकाळी सर्वाधिक लोकप्रिय ठरले होते. हसरत जयपुरी यांनीच हे गीत लिहिले होते. हसरत यांना ते गीत कसे सुचले ? तर त्यांचे पहिले अपत्य असलेला त्यांचा पुत्र अख्तर याच्यावरून ! त्याचा जन्म झाल्यावर हसरत त्याला पाहायला गेले आणि त्यांची नजर त्याच्यावर खिळली. आणि मग उत्स्फूर्तपणे ते गीत त्यांनी लिहिले.

निर्माते फकीर चंद (एफ. सी.) मेहरा आणि दिग्दर्शक लेख टंडन यांचा `प्रिन्स' हा चित्रपट १९६९ साली प्रदर्शित झाला. त्यात शमी कपूर आणि वैजयंतिमाला नायक-नायिका होते. प्राणही महत्त्वाच्या भूमिकेत होते. त्या चित्रपटातील "बदन पे सितारे लपेटे हुए" हे हसरत जयपुरी यांनी लिहिलेले लोकप्रिय गीत त्यांना कसे सुचले तो प्रसंगही मनोरंजक आहे. संगीतकार जयकिशन यांच्यासमवेत हसरत जयपुरी एका नाइट क्लबमधे गेले होते. त्या क्लबमधील एका कॅबरे नर्तिकेने छोटे रंगीबेरंगी दिवे (बल्ब) असलेला पोषाख परिधान केला होता. ती नाचत नाचत हसरत यांच्याजवळ आली, काही क्षण त्यांच्या मांडीवर बसली आणि नाचत नाचत दुसरीकडे गेली. तिचा जाण्याचा अवकाश आणि हसरत यांच्या डोक्यात एका गीताची ओळ घोळू लागली.... "बदन पे सितारे लपेटे हुए, ओ जान-ए-तमन्ना किधर जा रही हो, जरा पास आओ तो चैन आ जाए....." हसरत यांच्या शेजारीच बसलेल्या जयकिशन यांच्या कानावर त्या ओळी पडताच त्यांनी जराही वेळ न दवडता त्या ओळींना चाल लावली. हसरत जयपुरी यांनी यथावकाश संपूर्ण गीत लिहिले आणि अर्थातच सर्वश्रेष्ठ पार्श्वगायक मोहम्मद रफी यांनी नेहमीप्रमाणेच अभिनेते शमी कपूर यांच्या अभिनयाची ढब लक्षात घेऊन त्या पद्धतीने ते गायले. `प्रिन्स'चे दिग्दर्शक लेख टंडन यांनीही पडद्यावर शम्मी कपूर यांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन गीताचे बहारदार चित्रीकरण केले. ते गीत किती लोकप्रिय ठरले हे वेगळे सांगावयास नकोच.

हसरत जयपुरी यांना दोन भाऊ आणि दोन बहिणी होत्या. त्यांच्या थोरल्या भगिनी बिल्किस यांचा संगीतकार सरदार मलिक यांच्याशी विवाह झाला होता. मलिक यांचे अनू, डबू आणि अबू हे तीनही पुत्र संगीतकार बनले. पण त्यातील अनू मलिक हेच नावारूपाला आले. गीतकार हसरत जयपुरी यांच्या जन्मशताब्दी वर्षाची २०२२ साली एप्रिल महिन्यात सांगता झाली. काहीतरी बनण्याच्या ईर्ष्येने मुंबईला आलेल्या हसरत यांनी आपल्या अथक परिश्रमांद्वारे राधाला जे काही अपेक्षित होते ते अखेर करून दाखविलेच ! पण गीतकार इंदिवर यांनी `सरस्वतीचंद्र' या चित्रपटासाठी लिहिलेल्या "छोड दी सारी दुनिया किसी के लिए......" या गीताच्याच धर्तीवर हसरत जयपुरी यांनी त्या दिवसानंतर राधा कोठे आहे किंवा ती कोणाशी विवाहबद्ध झाली आहे याविषयी ना कोणाकडे कधी चौकशी केली ना राधाने हसरत यांच्याबद्दल काही जाणून घेण्याचा प्रयत्न केला ! ही एक अशी जगावेगळी प्रेमकहाणी होती जिच्यात सफल प्रेमाचे ध्येय भलेही साध्य झाले नसेल परंतु जर राधाचे शब्द हसरत यांच्या मनात खोलवर कोरले गेले नसते तर हिंदी चित्रपटसृष्टीला हसरत जयपुरी नावाचा हिंदी चित्रपटांमधील प्रणयगीतांचा अनभिषिक्त बादशहा गणला गेलेला लखलखता हिरा कदाचित मिळालाही नसता.....!

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# 'ऑनर किलिंग' रोखण्यासाठी कायदा येणार



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**समाज शिक्षित झाला असला तरी आज देखील आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाला समाज मान्यता देत नाही. असा विवाह करणाऱ्याला समाजातून बहिष्कृत केले जाते..अशा जोडप्यांपासून सामाजिक अंतर राखले जाते. एवढेच नव्हे तर प्रतिष्ठेच्या नावाखाली त्याची हत्या देखील केली जाते.ऑनर किलिंगच्या अनेक घटना राज्यासह भारतात घडलेल्या आहेत. आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना घाबरण्याची गरज नाही. कारण आताआंतरजातीय विवाह करणाऱ्यांना प्रशासन सुरक्षा पुरवणार आहे.आता आंतरजातीय विवाह करणाऱ्यांनी घाबरण्याची गरज नाही.**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सरकारच्या विशेष सचिवांनी डीएम आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. आंतरजातीय विवाहामुळे विवाहित जोडपे व त्यांच्या कुटुंबीयांना त्रास होत असेल, तर त्यांना सुरक्षा पुरवली जाईल, असे निर्देशांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी जिल्ह्यात सेल स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासंबं धीच्या खटल्यांची सुनावणी जलदगती न्यायालयात होणार आहे.

आंतरजातीय विवाहाच्या निषेधार्थ "ऑनर किलिंग" च्या घटना तामिळनाडूसह भारतातील अनेक भागात (उदा. हरियाणा) पहायला मिळतात. दलित वर्गातील लोक अशा गुन्ह्यांसाठी असुरक्षित मानले जातात. जरी एस सी/एसटी . कडक कायदे असले तरी सामाजिक प्रतिष्ठेच्या दबावाखाली कुटुंबीयांकडून असे गुन्हे घडतात.एकट्या तामिळनाडूमध्ये २०१३ ते २०१९ या कालावधीत अशा १९२ घटनांची नोंद झाली होती. ही घटना २००३ मध्ये घडली होती ज्यात १८ वर्षांची शिक्षा झाली होती. वेळ लागला

आजही भारतीय समाजातील आर्थिक-सामाजिक-राजकीय स्थिती जातीच ठरवतात.सामाजिक गतिशीलता भारतात अजूनही खूप कमी आहे. भारतीय राज्यघटनेत नमूद केलेल्या बंधुभावाच्या कल्पनेला पारंपरिक समाजात हवी तशी मान्यता मिळालेली नाही. पारंपारिक समाज तरुणांच्या, विशेषतः महिलांच्या 'निवड स्वातंत्र्या'च्या अधिकाराचा आदर करत नाही. आजही मुलींना शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी घराबाहेर पाठवण्याबाबत नकारात्मकता आहे.असं म्हणतात की बाप आपल्या मुलीवर मुलापेक्षा जास्त प्रेम करतो. एका मुलीला आपल्या वडिलांचा अभिमान असतो आणि मुली बहुतांशी वडिलांच्या जवळच्या असतात, मात्र गेल्या दहा दिवसांत वडिलांनीच आपल्या प्रेयसीची हत्या केल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. त्यांनी ज्या मुलीचे पालनपोषण केले आणि वाढवले, तिची निर्घृण हत्या करण्यात आली. शेवटी, वडील, किंवा भाऊ किंवा कुटुंबातील सदस्य स्वतःच्या मुलाला मृत्यूदंडाची शिक्षा का देतात, फक्त ती एका मुलावर प्रेम करते म्हणून? आजही मुलगा आणि मुलगी यांच्यातील प्रेमसंबंध समाजात का स्वीकारले जात नाहीत. समाजाच्या भीतीपोटीच कुटुंबातील सदस्यांना स्वतःच्या हृदयाचा तुकडा मारायला लावले जाते की राग इतका वरचढ होतो की ते स्वतःलाच अशी शिक्षा देतात की कोणाला धक्का बसेल? देशभरात अशा घटना मोठया प्रमाणावर घडत आहे.

ऑनर किलिंग' म्हणजे तथाकथित सन्मानासाठी



केलेल्या हत्या ज्यांना बहुतांश महिलांना सामोरे जावे लागते. त्यांची ओळख पटवणे फार कठीण आहे, कारण अनेक वेळा मालमत्तेच्या प्रकरणांमध्ये अशाच बहाण्याने खून केले जातात, म्हणून आपण त्यांची संख्या कोणत्याही समाजात शोधण्याचा प्रयत्न केला तर ते कठीण होईल. अनेकवेळा हे आत्महत्या आणि अपघात म्हणून मांडण्यात कुटुंब यशस्वी ठरते. आशिया खंडातील समाजांमध्ये, विशेषतः मध्य पूर्व आणि दक्षिण आशियामध्ये अशा घटना अधिक प्रमाणात घडत असल्या, तरी जगाच्या कानाकोपऱ्यात अशा घटना घडतात. दरवर्षी अंदाजे पाच हजार महिला या ऑनर किलिंगच्या बळी ठरतात, असे संयुक्त राष्ट्रांचे मत आहे. 'जगभरात सुमारे वीस हजार स्त्रिया अशा हल्ल्यांना बळी पडतात, असे स्त्रीवादी संघटनांचे मत आहे,' असे बीबीसीने वृत्त दिले आहे. हत्या हा या प्रकारच्या गुन्ह्याचाच एक प्रकार आहे. याशिवाय महिलांना ॲसिड हल्ला, अपहरण, विकृतीकरण, मारहाण अशा जवळपास अशाच कारणांमुळे सामोरे जावे लागते. समाजीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ती कुटुंबातील मूल्ये आत्मसात करते.जाणते किंवा अजाणतेपणी ज्या मूल्यांमध्ये तो जगतो ती मूल्ये/परंपरा हळूहळू त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनतात.जातिव्यवस्थेच्या स्थिरतेमागील मुख्य प्रेरक शक्ती ही सामाजिक असते. आणि कौटुंबिक स्वीकृती.

भारतीय संविधान समता, स्वातंत्र्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा या मूल्यांवर भर देते. राज्यघटनेने राज्य (सरकार आणि संस्था) आणि नागरिकांनी ही नैतिकता पाळावी अशी अपेक्षा आहे, परंतु परंपरागत समाज आपल्या जीवनात घटनात्मक नैतिकतेचा अवलंब करू शकलेला नाही. त्यामुळेच आजही जातीय वैमनस्य, लिंगभेद आणि जातीयवाद दिसून येतो, ज्याचा कळस आंतरजातीय विवाह/ आंतरधर्मीय विवाहाच्या नावाखाली होणाऱ्या ऑनर किलिंगच्या घटनांमधून दिसून येतो.आता प्रशासनाच्या घेतलेल्या पुढाकाराने आंतरजातीय विवाहास करणाऱ्यास कितपत संरक्षण मिळेल हा खरा प्रश्न असला तरी ऑनर किलिंगच्या घटनांचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे.

# मरावे परी कीर्तिरूपी उरावे

आधुनिक केसरी

मानवी जीवनात पदार्पण झाल्यावर माणसासारखे वर्तन व व्यवहार करुन जीवन यशस्वी करणे हे आपल्या सगळ्यांचे परम कर्तव्य असते. त्यासाठी माणसाने माणसाशी माणसासम वागावे म्हणजे समाजात व गावात आपली पथ घसरणार नाही. उलट प्रतिष्ठित व सन्माननीय व्यक्तीत आपली गणना केली जाईल.नेक व इमानदार माणूस म्हणून लोक आपल्याकडे चांगल्या हेतूने



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

बघतील.आपल्या माघारी सुध्दा आपले नाव काढतील.इतका मानपान आपल्याला गावकरी व समाज बांधव देतील.अशा नेक व चारीत्र्यवान लोकांनाच समाजात किंमत आहे.हे आपण अगोदर लक्षात घेतले पाहिजे.आपले आदर्श छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे चारित्र्य व कर्तृत्व हे लाखमोलाचे होते. त्यांनी समाजासाठी केलेले कार्य व संघर्ष वाखाण्याजोगा होता. म्हणून त्यांना जणतेने आजवर हृदयात स्थान दिले आहे. हे आपण सर्वजण जाणून आहोत. आपणही या महामानवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्याप्रमाणे वाटचाल केली पाहिजे. आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काहीजण काम करतात जवाएवढे आणि सांगतात पर्वताएवढे म्हणजेच सामाजिक कार्य करायचे थोडे आणि त्याचा प्रचार व प्रसार करायचा जास्त आणि इकडे लोकांना सांगत फिरायचे की मी लय समाजिक कार्य करतोय व समाजकार्यात भाग घेतोय.काम तर काहीच करायचे नाही पण लोकांना मीठ मिरची लावून सांगायला हे महाशय एक नंबरला असतात. परंतु मित्रहो आपण केलेले सामाजिक कार्य अथवा काम हे लोकांना सांगत बसायची काहीच गरज नाही.आपण केलेले काम लोकांना आपोआप दिसते.जसे कि फुलांना सांगावे लागत नाही कि मी सुगंधी आहे म्हणून त्याचा किर्तीरुपी सुगंध आपोआप दरवळत राहतो.त्याप्रमाणेच आपण केलेले काम सुध्दा आपोआप सर्वदूर पोहोचते.म्हणून बांधवांनो करतानाच काम असे करा व चारीत्र्य असे ठेवा कि आपण मेल्यावर सुद्धा लोक एक सज्जन माणूस म्हणून आपले नाव आदराने काढतील. म्हणतात ना मरावे परी किर्तीरुपी उरावे हे अगदी बरोबर आहे....

# जासई विद्यालयात विज्ञान प्रदर्शन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई. ता.उरण, जि. रायगड, या विद्यालयात सन २०२३ - २४ मधील शाळा पातळीवरील विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले.या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष,भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या शुभहस्ते झाले. त्यांनी चंद्रयान रॉकेट या नववी गुरुकुल मधील साहिल पाटील या विद्यार्थ्यांने निर्माण केलेल्या प्रयोगाची कळ दाबून विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्रमुख पाहुण्यांनी प्रयोगांचे निरीक्षण करून शाळेतील बाल वैज्ञानिकांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्या सोबत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख मार्गदर्शक म्हात्रे के.एम. कामगार नेते सोनवणे डी.पी.राजन घरत हे उपस्थित होते. उप मुख्याध्यापिका पाटील एस.एस. रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व वर्गशिक्षक, विज्ञान शिक्षक, सर्व सेवक वर्ग व सर्व विद्यार्थ्यांनी हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी केले.





# राज्यस्तरीय आव्हान शिबिरातील रॅलीने घडविले महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** राज्यस्तरीय दहा दिवसीयआपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर 'आव्हान' गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. आजच्या सातव्या दिवशी राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर आव्हान ची रॅली सुमानंद सभागृह पासून शहराच्या मुख्य मार्गाने मार्गक्रमण करत निघाली. तत्पूर्वी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी मशाल पेटवून तसेच रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. याप्रसंगी मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली, गोडवाना विद्यापीठाचे रासेयो संचालक तसेच आवाहन २०२३ चे समन्वयक डॉ. शयाम खंडारे, सहसमन्वक डॉ. प्रिया गेडाम, एन. डी आर. एफ. चे निरीक्षक पंकज चौधरी , नागपूर विद्यापीठाचे परीक्षक सतिश चाफले, जळगाव विद्यापीठाचे परीक्षक सचिन नाद्रे, नागपूर विद्यापीठाचे रासेयो संचालक सोपानदेव पिसे,गडचिरोली जिल्हा रासेयो समन्वयक डॉ.श्रीराम गहाणे, चंद्रपूर जिल्हा समन्वयक विजया गेडाम,विभागीय समन्वयक उषाताई खंडाळे, डॉ पवन नाईक, डॉ. गुरुदास बल्की, प्रदीप चाफले आदी उपस्थित होते.

धार्मिक सलोखा, एकात्मता, भारतीय संविधान, वारकरी संप्रदाय, विज्ञान तंत्रज्ञानामुळे झालेली प्रगती, पर्यावरण, मतदान जागृती अशा अनेक विषयांची हाताळणी करणारे देखावे, नृत्य, पोस्टर्स, विविध विषयांवरील फलक आणि सजीव देखावे या वेळेला राज्यातील विविध विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांनी सादर केले. यातून विविधतेतून एकता आणि महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी घडविले.या रॅलीत गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी रेला नृत्य तसेच डॉ. प्रकाश आमटे आणि मंदाकिनी आमटे यांची वेशभूषा, झाडीपट्टी रंगभूमीवर पोस्टर, अभय बंग, बाबा आमटे यांचे कार्य, जल, जंगल, जमीनचे महत्व, या भागातील संस्कृतीक वारसा, येथील आदिवासी संस्कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी घडविले. वाहतुकीला कुठलीही अडचण निर्माण न होऊ देता अगदी व्यवस्तीतरित्या ही रॅली गडचिरोली शहरातील सुमानंद सभागृहापासून इंदिरा गांधी चौक , पुढे शहरातील मुख्य मार्गाने मार्गक्रमण करत सुमानंद सभागृहात विसर्जित करण्यात आली. या संपूर्ण रॅलीत विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. महाराष्ट्रातील २२ विद्यापीठांमधील १००० विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते यामध्ये ३७पुरुष संघ व्यवस्थापक, ३७ महिला संघ व्यवस्थापक यांचा समावेश होता.या संपूर्ण रॅलीत एन. डी. आर. एफ.च्या चमूनेही मोलाचे योगदान दिले. या रॅली दरम्यान सिनेट सदस्य स्वरूप तारगे याचीही उपस्थिती लाभली. रॅली यशस्वी करण्याकरीता विद्यापीठातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी सहकार्य केले.

# गुरुकुंज आश्रमाला ‘अ’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

## ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लाखो गुरूदेव भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गुरूकुंज आश्रमाला विशेष बाब म्हणून ‘अ’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासाठी ग्रामविकास मंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता. अमरावती येथील गुरूकुंज आश्रम जगाच्या कानाकोपऱ्यातील गुरूदेव भक्तांसाठी महत्त्वाचे स्थान आहे. थोर विभूती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची येथे समाधी आहे. राष्ट्रसंतांनी राष्ट्रभक्ती, जागृती, अंधश्रद्धा-जातीभेद निर्मूलन, ग्रामविकास यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांच्याद्वारे लिखित ग्रामगिता अनेकांना जीवन कसे जगावे यासाठी प्रेरणा देते. मध्यप्रदेश व महाराष्ट्र शासनाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना स्वातंत्र्य संग्राम सैनिक म्हणून गौरविले आहे. १९३५ मध्ये गुरूकुंज मोझरी येथे राष्ट्रसंतांनी आश्रम स्थापन केले. हा केवळ आश्रम नसून गुरूदेव भक्तांसाठी ऊर्जास्रोत आहे, असे श्री. मुनगंटीवार यांनी आपल्या पत्रात नमूद केले होते. राष्ट्रसंतांच्या या कार्याला ‘अ’वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, अशी आग्रही मागणीही त्यांनी ग्रामविकास मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रातून केली होती. त्यानुसार ग्रामविकास विभागाने २८ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे महासमाधी स्थळ श्रीक्षेत्र गुरूकुंज आश्रमाला ‘अ’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान केला आहे. शासनाला यासंदर्भात विशेष बाब म्हणून तीर्थक्षेत्राला 'अ' दर्जा मिळवून दिल्याबद्दल गुरूकुंज आश्रम व गुरूभक्तांकडून सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त होत आहेत. यापूर्वी राष्ट्रसंतांचे नाव नागपूर विद्यापीठाला देण्यासाठी माननीय सुधीर मुनगंटीवार यांनी विविध संसदीय आयुधांचा वापर करत सातत्यपूर्ण प्रयत्न विधिमंडळात आणि बाहेरही उभारत मोठी लढाई यशस्वी केली होती. हे सर्व गुरुदेव भक्तांच्या स्मरणात आहेत आणि आता गुरुकुंज आश्रमाला 'अ' तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्याने जगभरातील गुरुदेव भक्तामध्ये आनंद व्यक्त होत आहे. गुरुकुंज आश्रमाला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राच्या दर्जा मिळावा म्हणून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सुरुवातीपासून पाठपुरावा केला. ऑगस्ट 2023 पासून त्यांनी यासाठी ग्रामविकास विभागाकडे पत्रव्यवहार गेला. त्यांच्या पत्रव्यवहारानंतर ग्रामविकास विभागाने प्रधान सचिवांना या संदर्भात तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळण्यासंदर्भात ग्रामविकास विभागाला प्रस्ताव सादर केला. अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव शासनाला सादर केल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रामविकास विभागाचे या संदर्भात लक्ष वेधले.



# धोंडीरामसिंह राजपूत यांना स्वच्छता व समाजसेवेचा "सेवा गौरव पुरस्कार"प्रदान


आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील प्रति गाडगेबाबा च्या भूमिकेत राहून गत ३० वर्षांपासून स्वच्छतादूत संत गाडगेबाबा यांचा स्वच्छतेचा वसा, समाज सेवा,अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण चा वारसा, पाणी वाचवा पाणी जिरवा, मेरी माटी -मेरा देश, माझी वसुंधरा महिला सक्षमीकरण, कोरोना काळात कोरोना योद्धा म्हणून भूमिका करून समाज बांधिलकी जपणे असे उपक्रम राबवून समाज सेवा करणारे, समाजसेवक, समाजसेवी म्हणून समाज कार्य करणारे धोंडीरामसिंह राजपूत यांच्या या कार्याची दखल घेऊन छत्रपती संभाजीनगर( औरंगाबाद )येथील सु-लक्ष्मी बहुउदेशीय सेवा भावी संस्थेने त्यांना माणुसकी समूहाचा "समाजसेवी गौरव पुरस्कार" देऊनशनिवार रोजी त्यांच्या समाजसेवेचा गौरव केला. संत गाडगेबाबांच्या समाज कार्याची ओळख करून देणारे स्मृती चिन्ह, गौरव पत्र व सन्मान पत्र, प्रति गाडगेबाबा धोंडीराम राजपूत यांना सपोनि दामिनी पथक आरती जाधव, सपोनि वर्षा व्हगाडे, सपोनि देविदास वाघमोडे, जेष्ठ पत्रकार स.सो. खंडाळकर, सुमित पंडित, ज्यू. चार्ली सोमनाथ स्वभावणे, प्रा. शरद सोनवणे, पूजा पंडित, मीरा पंडित,देविदास पंडित यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला, मौ,अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात पार पडलेल्या या कार्यक्रमात रक्तदान शिबिर ही घेण्यात आले,व समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम ही संपन्न झाले,धोंडीराम राजपूत याना हा समाजसेवी गौरव पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये परिजात काव्यसंग्रह विमोचन सोहळा आयोजित

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय येथे पारिजात काव्यसंग्रह विमोचन सोहळा आयोजित करण्यात आला होता संस्थेचे सचिव माननीय भाऊसाहेब काळे यांच्या प्रेरणेमुळे संकल्पनेमुळे हा काव्यसंग्रह प्रत्यक्षात येऊ शकला. या पारिजात काव्यसंग्रहामध्ये वीस विद्यार्थिनींनी कविता लिहिल्या दोन लेख लिहिले तसेच चार प्राध्यापकांनी देखील कविता लिहिल्या. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले माननीय श्री डॉक्टर ललित आधाने सर माननीय श्रीमती गीता म्हस्के मॅडम माननीय श्री सय्यदलाल सर तसेच संस्थेचे सचिव माननीय श्री भाऊसाहेब काळे सर व प्राचार्य माननीय श्री झिंजुर्के सर हे होते तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री विजय द्वार कुंडे सर हे होते. प्रमुख पाहुणे डॉक्टर ललित अधाने सर यांनी हसता हसवता कवितांमधून अतिशय मार्मिकपणे नकारात्मकतेमध्येही सकारात्मक शोधण्याची दृष्टी असे सुंदर मार्गदर्शन जिद्द, चिकाटी, प्रचंड कष्ट करण्याची तयारी यामुळे यश प्राप्त करता येऊ शकते त्याचबरोबर क्रीडा क्षेत्राचे महत्त्व देखील श्रीमती गीता म्हस्के मॅडम यांनी अधोरेखित केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रा वृषाली कुलकर्णी यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री प्रा नितीन पवार यांनी केले पाहुण्यांचा परिचय प्रा राम राठोड यांनी केला तसेच आभार श्री प्रा राहुल गायकवाड यांनी मानले. याप्रसंगी प्राचार्य योगेश झिंजुर्के सर प्रा मनोज राणे प्रा श्रीमती योगिता पारनेरे प्रा नितीन पवार राम राठोड वृषाली कुलकर्णी प्रा कृष्णा चव्हाण अविनाश गाडेकर योगेश सुरडकर श्रीमती जाधव मॅडम राहुल गायकवाड, दीपक पाटील, भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव यांची उपस्थिती होती.



# महाराष्ट्र मिलेट मिशन अंतर्गत कन्नड येथे पौष्टिक तृणधान्याविषयी प्रचार

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**



**पिशोर :** आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त व महाराष्ट्र मिलेट मिशन अंतर्गत कन्नड येथे पौष्टिक तृणधान्य विषयक प्रचार प्रसिद्धी व जनजागृतीसाठी कार्यशाळा व रोड-शो संपन्न. तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड व छत्रपत्री शिवाजी महाविद्यालय, कन्नड; यांच्या संयुक्त विदयमानाने पौष्टिक तृणधान्य प्रचार प्रसिद्धी कार्यशाळेचे आयोजन संयुक्त राष्ट्र संघटना (यूइनओ) यांच्या वतीने संपूर्ण जगभरात सन 2023 हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड व छत्रपत्री शिवाजी महाविद्यालय, कन्नड यांच्या संयुक्त विदयमानाने पौष्टिक तृणधान्य प्रचार प्रसिद्धी कार्यशाळा छत्रपत्री शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे आज दिनांक 28 रोजी मा. आमदार उदयसिंगजी राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, छ. संभाजीनगर श्री प्रकाश देशमुख, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. त्यानिमिताने सकाळी १०:०० वाजता मा. तहसीलदार श्री. विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते रोड-शो चे हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली. रोडशो मध्ये कृषी विभागाचे सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच श्री रामचंद्र प्राथमिक विद्यामंदिर, माळीवाडा कन्नड या शाळेचे ६ वी ते ८ वी चे विद्यार्थी तसेच शिक्षकवृंद श्री. सी. एच. मावची व श्री. एस आर सनान्से यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. रोड-शो हा तहसील कार्यालय कन्नड ते पिशोर नाका पर्यंत जल्लोषात संपन्न झाला.

छत्रपत्री शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे पौष्टिक तृणधान्य विषयक प्रचार प्रसिद्धी व जनजागृतीसाठी कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. किशोर झाडे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर तसेच श्री. डी. एस. कुलकर्णी, सेवानिवृत्त कृषि अधिकारी, छत्रपती संभाजीनगर उपस्थित होते. कार्यशाळेची प्रस्तावना तालुका कृषी अधिकारी श्री.बाळराजे मुळीक यांनी केली. त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक मा. आमदार श्री. उदयसिंगजी राजपूत साहेब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री. पी. आर. देशमुख यांनी उपस्थितांना पौष्टिक तृणधान्याचे महत्व याबाबत माहिती दिली. श्री. डी. एस. कुलकर्णी, सेवानिवृत्त कृषि अधिकारी यांनी पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्व सांगितले. डॉ. किशोर झाडे यांनी आहारातील महत्व वाढविण्यासाठी आहारात ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राजगिरा, राळा, कोडो, इत्यादी पिकाची उत्पादकता वाढविणे, उत्पादन वाढविणे, पिकाखालील क्षेत्र वाढविणे व या तृणधान्याची प्रक्रिया उद्योग या बद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधाण्याची घरोघरी, गावोगावी प्रचार प्रसिध्दी करण्याबाबत आव्हाहन केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमात सहभाग घेतलेल्या विदयार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत केले.

या कार्यशाळेस शिवाजी कॉलेज चे प्राध्यापक डॉ. अहिरराव, डॉ. भोसीकर, डॉ. मगर तसेच एन.सी.सी. व एन.एस.एस. चे विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच परिसरातील शेतकरी, बचत गटाचे सदस्य, कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. म्हेत्रे सर तसेच आभार प्रदर्शन श्री. दीपक बिरारे, कृषी पर्यवेक्षक यांनी केले.

# विशेष रेल्वे गाड्यांना प्रवाशांचा उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** प्रवाशांचा प्रतिसाद आणि अतिरिक्त गर्दी लक्षात घेता रेल्वेकडून ओखा-मदुराई, सूरत-ब्रह्मपुर (ओडिसा) विशेष रेल्वे गाड्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. आता या दोन गाड्या जानेवारी अखेरपर्यंत धावतील. अहमदाबाद, भुसावळ, अकोला, नांदेड, काचीगुडा, रेणीगुंटा, तिरुचिरापल्ली मार्गे धावणारी गाडी क्रमांक ०९५२० ओखा – मदुराई साप्ताहिक विशेष गाडीला ०१ ते २९ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९५१९ मदुराई-ओखा साप्ताहिक विशेष गाडीला ५ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. भुसावळ, अकोला, वर्धा, वारंगल, विजयवाडा, विजयनगरम मार्गे धावणारी ०९०६९ सूरत – ब्रह्मपुर साप्ताहिक विशेष गाडीला १७ ते ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ब्रह्मपुर – सुरत साप्ताहिक विशेष गाडीला १९ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. भोपाळ विभागातील संत हिरडाराम नगर-निशातपुरा दरम्यानच्या तिसऱ्या रेल्वे मार्गाचे काम व निशातपुरा स्थानकावर 'नॉन इंटरलॉकिंग'चे काम सुरू आहे. त्यामुळे ३८ गाड्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात अकोला मार्गे धावणाऱ्या हैदराबाद – जयपूर एक्सप्रेस विशेष गाडीचा समावेश आहे. गाडी क्रमांक ०७११५ हैदराबाद – जयपूर एक्सप्रेस विशेष १२ जानेवारी रोजी हैदराबाद स्थानकावरून रद्द केली आहे. गाडी क्रमांक ०७११६ जयपूर – हैदराबाद एक्सप्रेस विशेष १४ जानेवारी रोजी जयपूर स्थानकावरून रद्द केली आहे.



# कामे चांगली करून घेण्याची जबाबदारी ग्रामस्थांची : आ. हरीभाऊ बागडे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** गावातील विविध विकास कामे शासन स्तरावर मोठ्या प्रमाणावर निधी मिळतो परंतु ही कामे चांगले होत नसल्याची ओरड होते यामुळे गावातील विकासाची कामे होत असतांना त्या त्या गावातील कामे नागरीकांनी चांगल्या करुन घेण्याची जबाबदारी त्या गावातील नागरीकांची असुन संबंधित गुत्तेदारांनी देखील कामे चांगल्या दर्जाची करावी असा सल्ला आमदार हरीभाऊ बागडे यांनी रविवार ( 31 डिसेंबर) रोजी दिला. फुलंब्री तालुक्यातील गणोरी येथे गणोरी ते नायगांव रस्ता ग्रा. मा.५५ कि.मी. ०/०० ते २/४०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, ग्रामविकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत, सभागृहाचे बांधकाम करणे, जिल्हा परीषद निधीतील अंगणवाडी इमारत, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे अतिरिक्त वार्ड, जिल्हा परीषद प्राथमिक शाळा वर्ग खोल्याचे, तिर्थ क्षेत्र सोनगड भक्त निवास, भिल्लवस्ती घरकुलचे लोकार्पण, गणोरी येथे वर्ग खोलिचे, व संत रामलाल बाबा गेंदाई मंदीर परीसरात पेव्हर ब्लॉकचे भुमिपुजन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बाजार समितीच्या सभापती अनुराधा चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, माजी जिल्हाध्यक्ष विजय औताडे, तालुकाध्यक्ष सांडु जाधव राष्ट्रवादी कॉंग्रेस ( अजित पवार गट) उपजिल्हाध्यक्ष नितीन देशमुख, राहुल डकले, तालुकाध्यक्ष बाबासाहेब तांदळे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाउपाध्यक्ष बाळासाहेब तांदळे, सरपंच सरला तांदळे, उपसरपंच राजेंद्र तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना बागडे म्हणाले की, केंद्र व राज्य सरकार शेतकरी हिताचे असुन प्रत्येक गावाला भरभरुन निधी उपलब्ध करुन देत आहे. आत्ताच झालेल्या हिवाळी अधिवेशनात फुलंब्री तालुक्याच्या रस्ते विकासासाठी 40 कोटी रुपयांचा निधी मंजुर करुन घेतला आहे. तालुक्यातील सर्व रस्ते चांगले झाले मी चाळीस वर्षापुर्वी आमदार झालो. तेव्हा फक्त छत्रपती संभाजीनगर ते फुलंब्री हा एकच रस्ता चांगला होता आता सर्वच रस्ते चांगले आहे. आता शेतवस्तीकडे जाणारे रस्तेही डांबरी झाले आहे तर गिरजा वाकोद नदी जोड प्रकल्पासाठी 100 कोटीचा निधी मंजुर केला असुन गिरजा नदीवरील बंधारे भरल्यानंतर वाहुन जाणारे पाणी हे वाकोड प्रकल्पात वळविण्यात येणार आहे. यामुळे हजारो हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे याची निविदा प्रक्रिया चालु असुन लवकरच या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होणार असल्याचे बागडे यांनी सांगितले.

दरम्यान गणोरी ते खांडी पिंपळगाव या रस्त्याचे काम अनेक दिवसापासुन प्रलंबित असुन या रस्त्याबाबत ग्राममस्थांनी भर सभेत हे काम प्रलंबित असल्याचे बागडे यांना सांगितले यावेळी बागडे यांचा चांगलाच पारा चढला यावेळी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राजकुमार हिलाले यांना चांगलेच झापले व कामाबाबत रोष व्यक्त केला तर संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाका त्याच्याकडुन काम काढुन घ्यावे व गुत्तेदाराकडुन दंड वसुल करावा अशा सुचना अधिकार्यांना दिल्या. याप्रसंगी सर्जेराव मेटे, सरपंच सरला तांदळे, उपसरपंच राजेंद्र तांदळे, गटविकास अधिकारी विनायक राठोड, बाळासाहेब तांदळे, संतोष तांदळे, मच्छिंद्र चव्हाण, विलास उबाळे, ग्रामविकास अधिकारी कचरु जंगले, विवेक चव्हाण, विजय मोरे, कैलास सोनवणे, गोपाल वाघ, सुचित बोरसे, इलियास शहा यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






# उरण मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांनी घेतली पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर संजोगभाऊ वाघेरे पाटील यांनी हजारो कार्यकर्त्यांसह मातोश्री, मुबंई येथे जाऊन माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना (ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला, यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या उरण मतदार संघातील प्रमुख पदाधिकारी यांनी पक्षप्रमुख श्री उद्धवसाहेब ठाकरे यांची रायगड जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील व रायगड जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली सदिच्छा भेट घेतली. यामध्ये उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, खालापूर तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे, युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, उपतालुकाप्रमुख कमलाकर पाटील, युवासेना उपजिल्हाधिकारी अवचित राऊत व पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# नांदेड शहरात ७ जानेवारीला सावित्री रमाई महोत्सव

## माजी मंत्री डी. पी. सावंत, सुषमा अंधारे, अमर राजूरकर, प्रा. शिवराज मोटेगावकर यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील बुद्धीष्ट रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने रविवार दि. ७ जानेवारी रोजी दुपारी ३ वा. शहरातील कै. डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात सावित्री रमाई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर हे राहणार असून माजी मंत्री डी. पी. सावंत यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे तर माजी विधानपरिषद सदस्य अमरभाऊ राजूरकर, प्रख्यात वक्त्या सुषमाताई अंधारे, आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, जिल्हा कोषागार अधिकारी ज्योती बगाटे, सायन्स कॉलेजचे उपप्राचार्य प्रा.



डॉ. लक्ष्मण शिंदे, जि.प. च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रोहिणी एंगडे, ज्येष्ठ ओबीसी नेते बालाजी इबितदार, युवा आंबेडकरी नेते राहुल लोहबंदे यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती निमंत्रक तथा माजी नगरसेवक महेंद्र पिंपळे, संयोजक प्रवीणकुमार कुपटीकर, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, संयोजन समितीच्या अध्यक्षा अंजली मुनेश्वर यांनी आज येथे दिली.

मुक्ता साळवे नगरीत ( कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह) सावित्रीमाई फुले यांची १९३ वी जयंती आणि माता रमाई आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त सावित्री रमाई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात कवयित्री रुपाली वागरे वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटनपूर्व कविसंमेलन होणार आहे तर उद्घाटन सत्रानंतर सुप्रसिद्ध व्याख्यात्या सुषमा अंधारे यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान होणार आहे. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या सिने पार्श्वगायिका कविता राम आणि संचाचा बुद्ध भीम गितांचा बहारदार कार्यक्रम संपन्न होईल. दरम्यान, कु. श्रीया पाटील या बालिकेचे रमाईगितावर नृत्य प्रहसन होणार आहे. तसेच सावित्री रमाई जीवन गौरव पुरस्कार, माता रमाई आंबेडकर विशेष सन्मान पुरस्कार, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले समाजभूषण व त्यागमुर्ती माता रमाई समाजभूषण पुरस्काराचे वितरण प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कल्पना जाधव, डॉ. भीमराव हटकर हे करणार आहेत. महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बी. आर. फाऊंडेशनचे संस्थापक कोंडदेव हटकर, अध्यक्ष सुमेधा हटकर, सचिव अर्चना गवारे, संयोजन समितीचे कार्याध्यक्ष सत्यपाल सावंत, उपाध्यक्ष डॉ. साहेबराव ढवळे, सहकार्याध्यक्ष अजय एडके, सचिव जी. पी. मिसाळे, सहसचिव डॉ. राम वनंजे, राज गोडबोले, सदस्य विजय सोंडारे, लक्ष्मीकांत हटकर, संध्या जांभळे, सुनिता कानिंदे, शोभा कोकरे, सुनिता वासाटे, रमेश कसबे, एन. टी. पंडित, आर. पी. कोकलेगावकर, सी. एस. ढगे, एम. डी. जोंधळे, नितिन एंगडे, मिलिंद नरवाडे, डॉ. किशन गायकवाड, संजय जाधव, नागोराव डोंगरे, अनुरत्न वाघमारे, पांडूरंग कोकुलवार, मारोती कदम, शंकर गच्चे, कैलास धुतराज, रणजीत गोणारकर, चंद्रकांत कदम, प्रशांत गवळे, प्रकाश ढवळे नागलगांवकर तसेच सल्लागार एन. डी. गवळे, प्रफुल्ल सावंत, प्रा. कैलास राठोड, सुरेश हटकर आदींनी केले आहे.

# पाडेगाव येथे ९४ जणांची डोळे तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ज्ञानज्योती क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या १९३ व्या जयंती निमित्त पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशन, हेल्प एज इंडिया व एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक २८ डिसेंबर रोजी श्री संत सावतामाळी महाराज मंदिर नेवसेवस्ती पाडेगाव या ठिकाणी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व डोळ्यांच्या इतर आजारासंदर्भात अचूक निदान व उपचार शिबीर संपन्न करण्यात आले.
समाजहिताच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकी जपणारे आरोग्य विषयक कार्य हे डोळ्याच्या संदर्भातील शिबीर घेऊन अनोख्या पध्दतीने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली.शिबिर प्रसंगी श्री संत सावता महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिबिराचे उदघाटन पाडेगावचे सरपंच राहुल कोकरे यांच्या हस्ते फित कापुन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव, युवानेते नितीन जगताप, मानवाधिकार कार्यकर्ते प्रशांत ढावरे, आबासाहेब मोरे, नरेश गायकवाड, चंद्रकांत गोरे, प्रभाकर नेवसे,बापूराव नेवसे, पाडेगाव सामाजिक विकास फाउंडेशनचे अध्यक्ष गिरीश बनकर व एच. व्ही. देसाई रुग्णालय नेत्र चिकित्सक आदी उपस्थित होते. सदर शिबिरात रुग्णांची रक्तदाब व साखरेची पातळी चाचणी देखील पाडेगाव आरोग्य उपकेंद्रातर्फे डॉ.समर्थ कस्सा व त्यांच्या टीम मार्फत करण्यात आली. शिबिरास गावातील व गावाबाहेरील लोकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून प्रतिसाद दिला.यामध्ये तब्बल ९४ रुग्णांची डोळे तपासणी करून काहींना नंबरचे चष्मे अल्पदरात देण्यात आले.तर उपचारार्थी काही रुग्णांना औषधांचा पुरवठा हा पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन मार्फत मोफत करण्यात येणार आहे.मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी १४ रुग्ण हे तात्काळ पुण्याला पाठवण्यात आले.
सदर शिबिराच्या आयोजनासाठी व शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे कार्यकर्ते महेश ढावरे, सनी रायकर, संदेश नेवसे,किरण गोरे, रोहित नेवसे, विशाल ढेकळे यांनी बहुमूल्य योगदान दिले. पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनच्या वतीने अध्यक्ष गिरीश बनकर यांनी या सर्व कार्यकर्त्यांचे तसेच एच व्ही देसाई हॉस्पिटल स्टाफ, पाडेगावचे विनोद भुजबळ यांच्या सहकार्याबद्दल तसेच प्रमुख मान्यवर पाडेगाव आरोग्य उपकेंद्राचे सर्व कर्मचारी स्टाफ आणि शिबिरामध्ये सहभागी झालेल्या रुग्णांचे आभार व्यक्त केले.



# संगीत साधनेतून भक्ती मार्ग... अहमदपूरच्या दत्त मंदिराचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदपूर :** पावणे दोनशे वर्षे प्राचीन असणाऱ्या दत्त मंदिरामध्ये विविध धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. अहमदपूर येथील श्री माणिक प्रभूंच्या हस्ते या दत्त मंदिराची स्थापना करण्यात आलेली आहे. येथे श्री दत्त पादुकांच्या रूपाने श्री दत्तात्रय महाराजांची गादी स्थापन करण्यात आलेली आहे. दरवर्षी या दत्त मंदिराच्या माध्यमातून संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात येते यंदाचे हे २९ वे वर्ष होते.संगीत महोत्सवाच्या पहिल्या दिवशी 23 डिसेंबरला सांगलीचे प्रसिद्ध गायक अभिषेक काळे यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.
अभिषेक काळे यांची गायनाची मैफिल रात्री एक पर्यंत रंगत गेली. त्यांनी शास्त्रीय गायनाच्या बरोबर काही नाट्यगीत अभंग देखील गायले ते लोकांना मनापासून आवडले. दुसरे दिवशी २४ डिसेंबरला पुण्यामधील सौरभ नाईक यांच्या शास्त्रीय गायनाच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आलेले होते. सौरभ नाईक यांनी नाट्यगीतां बरोबरच अभंग देखील गायले ते लोकांना खूप आवडले ही मैफिल देखील रात्री एक वाजेपर्यंत रंगत गेली. तिसऱ्या दिवशी 25 डिसेंबरला ह. भ .प .भागवताचार्य कैलास महाराज मद्दे लिंगधाळकर यांचे कीर्तन सर्व भक्तगणांना मनापासून आवडले आपल्या कीर्तनात कैलाश महाराज मद्दे लिंगधाळकर म्हणाले. संगीत साधना करणे हा भक्तिमार्गच आहे भजन कीर्तन नामस्मरण ही भगवंताला भेटण्याची साधनाच आहे.
अहमदपूरच्या प्राचीन दत्त मंदिरात चाललेल्या




तीन दिवसाच्या संगीत महोत्सवात अहमदपूरचे रसिक जन व भक्तगण रममान होऊन गेलेले होते. तिसरे दिवशी जिर्णोद्धार केलेल्या दत्त मंदिरात प्राचीन दत्त मूर्तींची प्राणप्रतिष्ठा किशोर पंतजी व राधिका पंतजी च्या हस्ते गजानन जोशी व मकरंद जोशी यांच्या मंत्रघोषित करण्यात आली. शेवटी सर्व भक्त जणांसाठी भंडाऱ्याची व्यवस्था देखील करण्यात आलेली होती. दत्त मंदिराचा जिर्णोद्धार व दत्तमूर्तींची प्राणप्रतिष्ठा आणि संगीत महोत्सवासाठी विशेष परिश्रम घेणाऱ्या ग्रामस्थांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तीन दिवस चाललेल्या या संगीत महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी शामा पंतोजी, माया पंतोजी, नेहा पंतोजी, राधिका पंतोजी, स्वप्ना पंतोजी, अंजली पोहनेरकर, विजया देशपांडे, सरोज टोणपे, अर्चना चौधरी, अंकेत, ऋषी, अनुष्का, पुष्कर, मृणाल, सई, बेला अशा पंतोजी परिवारातील सदस्यांनी मोठे परिश्रम घेतले त्यामुळे हा कार्यक्रम लोकांच्या हृदयापर्यंत पोहोचला हे बाकी खरं.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर